# गीता – पुरुषोत्तमी



# कोयनातीर

• संपादकः स. सि. उर्फ आप्पा गरुड. कऱ्हाड. •

## गीता पुरुषोत्तमी

[ खास अंक ]

वर्ष : ६ वे   अंक ३३ ते ३६   रविवार दि. २२ डिसेंबर ८५   किमत ४ रुपये

लेखक :- **पु. पां. उर्फ बाबूराव गोखले**
यांनी समश्लोकीत रूपांतर केले.

मालक, संपादक, प्रकाशक :- **स. सि. उर्फ आप्पा गरुड** यांनी

दिग्वीजय प्रिंटींग प्रेस कराड येथे छापून कराड व पाटण येथे प्रसिद्ध केला.

मुखपृष्ठ :- **दादासाहेब सुतार कराड**, यांनी तयार केले.

**श्री. म. ब. जोशी, श्री. पो. डी. जोशी व श्री. विलासराव घळसासी**
यांनी हा अंक तयार करणेसाठी बहुमोल सहकार्य केले.

प्रकाशन हक्क : संपादक कोयनातीर, कराड.

# प्रस्तावना –

शेतकरी शेतात बी पेरण्याच काम करतो. चांगल पीक येंण न येण त्याच्या ताब्यात नसत. म्हणून काही तो आपले कर्तव्य चुकत नाहीं त्याप्रमाणं पालकांनी आपल्या पाल्यावर सुसंस्कार करण्याचे कर्तव्य बजावले पाहिजे हे सुसंस्क र करण्याचे कार्य पूर्वी शिवाजी महाराजांच्या मातोश्रींनी लोकमान्य टिळकांच्या मातोश्रींनी, डॉ. आंबेडकरांच्या तीर्थरुपांनी, महात्मा गांधींच्या गुरुजींनी केले होते. पण आज काल बदलला आहे. घरी मनावर सुसंस्कार करणारी आजोबा – आजी अशी मंडळी उरली नाहीत आणि जरी उरली असली तरी मुलांना 'सवड' नाही मनाचे श्लोक, संत तुकारामांचे अभग, संत ज्ञानेश्वरांच्या ओव्या किंवा श्रीमद्‌भगवद्‌गीतेंचे श्लोक यापैकी कशाचेच पाठांतर हल्ली उरलेले नाही.

श्रीमद्‌भगवद्‌गीता संस्कृतात आहे म्हणून क्वचित एखादा तिकडे वळतो. पण हीच गीता मराठीत आणली तर! पूर्वी भगीरथाने स्वर्गात असलेली गंगा पृथ्वीवर आणून आपल्या पूर्वजांचा उद्धार केला. तसाच भगीरथ प्रयत्न गीर्वाणवाणीत असणारी गीता मराठी 'गीतापुरूषोत्तमी' या सहजसुलभ रुपांत आणून भावी पिढ्यांच्या उद्धाराचे महान कार्य कराडचे समाजभूषण श्री. पु. पां. तथा बाबूरावजी गोखले यांनी केले आहे.

संस्कृतमधील श्लोक जसे गेय आहेत तसेच 'गीता पुरूषोत्तमी' मधील श्लोकही गेय आहेत. मूळ श्लोकातील अर्थ कुठेही उणा अधिक न करता मराठीत सहजपणे कळेल अशा स्वरुपात आणलेला आहे. त्यामुळे मुलांचे गीतापाठांतर सार्थ तर होईलच पण संस्कृत गीता काय आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता व संस्कृतची गोडी देखील कळणार आहे.

जीवनाला अर्थ प्राप्त करुन देण्याचे, जीवनाला दिशा प्राप्त करुन देण्याचे इतकेच नव्हे तर उत्तम पुरुष कसे व्हावे याचे मार्गदर्शन 'गीता–पुरुषोत्तमी' निश्चितपणे करील असा विश्वास त्या उत्तम पुरुषाने भगवान श्रीकृष्णाने फलद्रूप करावा हीच इच्छा.

**भगवानदास**

## संपादकीय :–

यंदा १९८५ साली. दे. पांडुअण्णा शिराळकरानीं व गुरुवर्य दुवेदी मास्तरनी, वेदशास्त्रसंपन्न तासगांवचे श्री. सदाशिवशास्त्री भिडे यांचे हस्ते गीताजयंती–उत्सव सुरू केला त्यास एकसष्ट वर्षे होतात. त्यांच्या स्मरणाप्रीत्यर्थ कोयनातीरचा हा गीता जयंतीचा अंक कृतज्ञेतेने प्रसिद्ध होत आहे. लोकमान्य वा महात्माजी आपल्या गीताग्रंथालाच आयुष्यात महत्व देत आले होते. आणि कधीकाळी सर्व मानवजातीचा एक धर्म व्हावयाचा असेल तर तो गीताधर्मच होय असे कऱ्हाडहून पन्नास वर्षा पूर्वीच प्रसिद्ध झालेल्या " गीता धर्म प्रवेश " या ग्रंथात म्हटले होते. " सर्वधर्मी समानत्व " च्या घोषणा आजकालच्या धन महत्वाच्या काळांत होत असल्या तरी ऋग्वेदा त्या जगातील धर्म ग्रंथातूनचा इतिहास पाहिला तर सर्वधर्मी समानत्वाच्या घोषणा " बोलाचीच कढी बोलाचाच भात " होत हे स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणेच सिद्ध आहे. गीताधर्म [illegible] जगातील विवेकवंतांच्या मते मानव धर्म होण्या–सारखा असला तरी, त्यात फलाशा सोडून कर्तव्यासाठी कर्तव्य करण्याचे जे तत्व आहे, त्याचे कौतुक गुणग्राहकतेने होत नाही, हे अनुभव सिद्ध आहे. म्हणून– " कर्मसंन्यासात् " कर्मयोगो विषेशत्ये । " हे संसारात राहूनही अतिथीवत् " आचरण करण्याचे सर्वस्वी जमत नाही तसे ते जमले पाहिजे, ह्यात शंकाच नाही. म्हणूनच संस्कृति–संस्कार ताजे व्हावयाकरिता, भारतीय संस्कृतीने " वाचेलिचे वाचावे पुनःपुन्हां " हा मार्ग दाखविला आहे. गीताजयंती चा अंक काढण्यात, त्याच पुरुषार्थाला मदत करावी, हाच इच्छा आहे.

**संपादक**

## गीता पुरुषोत्तमी

(भगवद्गीतेचे हे रुपान्तर मराठींत सहज समजेल अशा सयमक, समश्लोकींत आहे. गीता पुरुषार्थबोधिनी आहे. ती ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम ' अशा भाग्यविधात्या पूर्णावतार श्रीकृष्णाने सांगितली आहे. तिच्यात 'पुरुषोत्तम' योग साधावा याचे विवेचन असून, त्या नावाचा एक अध्यायही आहे. म्हणून भगवद्गीतेच्या समश्लोकीस " गीता पुरुषोत्तमी " हे सार्थ नांव आहे. ) "

मनुष्य आयुष्याची पाउले टाकतांना, त्याच्या बऱ्यावाईट परिणामास भिडेल, अगर काळाची पाउले ओळखून त्यास सामोरे न जाईल वा सामना न देईल, तर तो मूर्ख आहे असे समर्थ म्हणतात. ( न मिळे आलिया पदार्था । तो एक मूर्ख ) हा मूर्खपणा करायचा नसेल, तर आपण पत्करलेल्या वा कालोघांत दत्त म्हणून उभे राहिलेल्या कर्तव्यकर्माचे पालन मनुष्याने केलेच पाहिजे. ते करितांना फलाशा न धरिता, कर्तव्यासाठीच कर्तव्य ही जाण मनुष्याने राखणे जरुर आहे. त्यालाच कर्मयोग म्हणतात. त्यासाठी संसारात वावरून अतिथिची वृत्ति स्वीकारावी लागते. तिचा आदर वा कौतुक बहुधा होणारच नाहीं. ! तरी मनुष्याने आपले ब्रीद सोडू नये. हाच निष्काम कर्मयोग वा अनासक्ती योग गीतेने शिकवला आहे. त्यानेच " महत्कृत्य व्हावे, जनी येश यावे । प्रभूसी समस्तासी कल्याण व्हावे ॥ "

पु. पां. गोखले

ऐकाया धृतराष्ट्र उत्सुक बसे, सांगे कथा संजय।

# अध्याय १

धृतराष्ट्र-

" पुण्याशा त्या कुरुक्षेत्री, युद्धा उत्सुक नेटले।
माझे नि पांडुचे पुत्रीं, संजया काय साधले " ॥ १ ॥

संजय-

" रेखिली पांडवी सेना, तैं दुर्योधन पाहतां।
आचार्यापाशि ये राजा, बोल हो आणि काढिता ॥ २ ॥
पहा हे पांडुपुत्रांचे सैन्य, आचार्य थोरले।
शाहण्या आपुल्या शिष्यें द्रौपदाने उभारले ॥ ३ ॥
इथे शूर टणत्कारी, रणी भीमार्जुनासम।
सात्यकी तो विराटेश रथी द्रुपद उत्तम ॥ ४ ॥
धृष्टकेतू, चेकितान शूर काशीश आणि तो।
पुरुजित् तो कुंतिभोज, नरपुंगव शैष्य तो ॥ ५ ॥
युधामन्यू नि विक्रान्त, उत्तमौजा हि विक्रमी।
अभिमन्यू, द्रौपदेय सारे ते रथ-सत्तमी ॥ ६ ॥
ध्यानी घ्या ब्राह्मणश्रेष्ठा, जे जे ठळक आमुचे।
सैन्याचे माझिया नेते, सांगतो आपुल्या रुचे ॥ ७ ॥
आपण अन् भीष्म, कर्ण, कृप, रणंजयी तसा।
अश्वत्थामा, सौमदत्ती हुबेहुब विकर्णसा ॥ ८ ॥
दुजे शूर किती ज्यानी जीव ओवाळला मला।
नाना शस्त्रांचिया सारे युद्धाच्या जाणती कला ॥ ९ ॥
बेफाट आमुची सेना, भीष्म की पाठिशी जिच्या।
त्यांची तो तोकडी सेना भीम की पाठिशी जिच्या ॥ १० ॥

धरोनी सर्व मोर्च्यांची नाकीं जी कां स्वताकडे ।
एक भीष्मास राखावे, हें सारे आपणाकडे ।। ११ ।।
त्याच्या हर्षा उभारी दे आजोबा वृद्ध कौरवी ।
प्रतापी सिंहनादाने शंख जोरात वाजवी ।। १२ ।।
त्या सरीं शंक कीं भेर्या, पणवानक गोमुख ।
वाजली एक गर्दीने, हो तो शब्द भयानक ।। १३ ।।
तेव्हांच शुभ्र घोड्यांच्या रथीं मोठ्या विराजल्या ।
माधवें, अर्जुनें फुंकी दिव्य शंखां सवे दिल्या ।। १४ ।।
पांचजन्य हृषीकेशें, देवदत्त धनंजये ।
केला पौंड्र महाशंख भीमें कार्य-हिमालयें ।। १५ ।।
धर्मराजे फुंकियेले अनन्त-विजया निका ।
नकुलें, सहदेवें कीं सुघोषा-मणिपुष्पका ।। १६ ।।
काश्य मोठा टणत्कारी, शिखंडी तैं महारथी ।
विराट कीं धृष्टद्युम्न, सात्यकी यश ज्याप्रती ।। १७ ।।
द्रुपद द्रौपदीपुत्र, सर्वथा पृथिवी-पते ।
सौभद्र लांब हाताचा, वेगळे शंख फुकिते ।। १८ ।।
तो घोष कौरवांचीं कीं विदारी हृदयें पुरीं ।
भयप्रदही घोंगांवे भूवरीं आणि अंबरीं ।। १९ ।।
पुन्हा सावरलेल्या त्या कौरवां पार्थ पाहूनी ।
शस्त्रें जो का झडायाची धनु कपिध्वज घेऊनी ।। २० ।।

**अर्जुन-**

हृषीकेशा तदा वाक्य राजा तो हेच बोलत ।
दोनी सैन्याचियामध्यें रथ ने, ठेव अच्युत ।। २१ ।।
पाहतो म्हणजे हे मी उभे युद्धा हपापले ।
संग्रामी झुंजण्याला या माझ्याशी कोण जोखले ।। २२ ।।
मी देखे घातले झुंजू जे हे होत इथे जमा ।
दुर्बुद्ध कौरवाची ज्या युद्धीं ये राखणे तमा ।। २३ ।।

संजय-

अर्जुनें बोलतां ऐसें हृषीकेशही भारता ।
दोन्ही सैन्याचिया मध्यें हो रथोत्तम ठेवता ॥ २४ ॥
बोले कीं भीष्म नि द्रोण नेते सर्वांस अर्जुन ।
भूपती अन् नेटलेले, घे ते कौरव पाहुन ॥ २५ ॥
तेथे पाहे उभे पार्थ, आजोबाही वडीलसे ।
गुरु, मामे, भाऊ, बाळे, नातू आणि सखे तसे ॥ २६ ॥
सासरे, सोयरे सर्व जिव्हाळ्याचेच ठाकले ।
दोन्हीं सैन्यामध्यें त्यांना अर्जुने जों न देखिले ॥ २७ ॥
ओथबे करुणा पोटी विटोनी हे वदे त्वरे ।

अर्जुन-

" कृष्णा, स्वजन पाहोनी हे उभे युद्ध-हावरे ॥ २८ ॥
गात्रेच गळती माझी होतसे तोंड कोरडे ।
शरीरीं कंप ये माझ्या, रोमांच उठती खडे ॥ २९ ॥
त्वचेची आग हो आग, सुटे गांडीव हातीचे ।
उभा राहू शकेना मी, फिरे चक्कर चित्तिचे ॥ ३० ॥
लक्षणे भलती पाहे, आणखी मात्र केशवा ।
येईना श्रेय की ध्याना, आप्त युद्धी चिरोनिया ॥ ३१ ॥
छे ! नको जय तो कृष्णा, ते नको राज्य, ती सुखे ।
राज्य काय आम्हां भोग, काय वा जीविते निके ॥ ३२ ॥
ज्यांच्यासाठी हवी आम्हां राज्य, भोग, सुखे तशी ।
ते हे युद्धा उभे ठेले प्राणानिशी, धनानिशी ॥ ३३ ॥
आचार्य वडीलधारी, आजोबा आणि त्यापरी ।
सासरे, मेहुणे, नातू, मामे आणिक सोयरी ॥ ३४ ॥
यांना न मारुं इच्छी मी, आलो कामा प्रभो जरी ।
त्रिलोकाच्या न राज्याचा, पृथ्वीचा पाड कां तरी ॥ ३५ ॥

मारुनि कौरवा होई, आमुचे प्रिय कोणते ? ।
जडे पाप आम्हा, यातें मारितां आततार्इते ।। ३६ ।।
तेव्हां न शोभते आम्हां गुरु-बंधूस मारणे ।
माधवा आप्त मारोनी होऊ कैसे सुखी मने ।। ३७ ।।
लोभे न दिसते यांना जीवन्मृत मनाचिया ।
दोष कुलक्षये येते, मित्रद्रोहांत पाप या ।। ३८ ।।
अम्हां कैसे कळावे ना, टाळणे पाप हे तरी ।
कुळक्षये व्हावयाचे दोष ज्या दिसती हरी ।। ३९ ।।
कुळा नाश तरी नाश कुलधर्मा सनातन ।
धर्मनाशे कुळी साऱ्या ये अधम वहारुन ।। ४० ।।
अधर्मा भर तों कृष्णा, लागे चळ कुळस्त्रियां ।
स्त्रियां चळताच वार्ष्णेया, वर्णसंकर दे ठिया ।। ४१ ।।
कुलांचा नि कुलघ्नांचा होई नरक संकरे ।
त्यांचे ढाळसती बाप, पिंड-पाणी-क्रिया सरे ।। ४२ ।।
या दोषांनी कुलघ्नांच्या वर्णसंकरकारक ।
जातीचे उडती धर्म कुळाचे आणि धारक ।। ४३ ।।
उडाल्या कुळधर्माच्या माणसाते जनार्दन ।
राहणे नरको लागे ऐसे आहोत ऐकुन ।। ४४ ।।
अरेरे ! केवढे पाप कराया सजलो अम्ही ।
जो राज्य-सुख-लोभाने, आप्तेष्टी उठलो श्रमी ।। ४५ ।।
रे मला स्वस्थ निःशस्त्रां शस्त्रांनी हातिच्या रणीं ।
मारिता धार्तराष्ट्रांनीं माझ्या ते हितकारणी ।। ४६ ।।
बोलोनि हे रणी बैसे, रथीं सन्निध अर्जुन ।
टाकोनि चाप बाणाते, शोकावेगी तसे मन ।। ४७ ।।
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायी शास्त्रें सर्व समन्वया ।
श्रीकृष्णार्जुन-संवादी पार्थ-विशाद नावाचा ।
अध्याय पहिला सर्वा होवो मंगल, व्हायचा ।। १ ।।

# अध्याय २

संजय–

" त्या तशा करुणाग्रस्ता आल्या भरुनि नेत्रिच्या ।
शोक-कर्त्यास या गोष्टी मधुसूदन–वाणिच्या " ।। १ ।।

कृष्ण–

" अक्काबाई अवेळी ही आठवे तुज कोठून ? ।
शिष्ट धिक्कृति, दुष्कीर्ति, जिने दुर्गति अर्जुन ।। २ ।।
क्लीवता-प्रति ना जाई, पार्थ हे न तुझ्याकडे ।
ऊठ रे ऊठ बीवींचे फेंक दौर्बल्य बापुडे " ।। ३ ।।

अर्जुन–

" कसा मीं रणि भीष्माला, द्रोणास मधुसूदन ।
करुं हैराण बाणांनी ? करावे ज्यांस वंदन ।। ४ ।।
गुरुंस ना मारुनि थोर थोरां ।
येथे भिकेचा जगि छान चारा ।
वधोनि कल्याणकरी गुरुंस
भोगूं न रक्तांकित भोग खास ।। ५ ।।
कळे न आम्हा कुठले हिताचे
व्हावे जयी वा अजयी रणाचे ।
वधोनि ज्याते जगणें न आम्ही
आलेत ते कौरव अग्रगामीं ।। ६ ।।
स्वभाव संपातिच दैन्यभावे
कर्तव्य नेणें मन तो पुसे हे ।
कथीं मला निश्चित ते हिताचे
दे शीक शिष्यास तुझे पदाचे ।। ७ ।।

शमेल माझा मजला दिसेना
जो शोक शोषितच इंद्रियाला ।
मिळोहि समृद्ध अजोड येथे
साम्राज्य, स्वामित्वहि वा सुरीं ते ॥ ८ ॥
बोलोनि हे हृषीकेशा, गुडाकेश म्हणे पुन्हा ।
'लढायाचाच नाही मीं !' स्तब्ध हो शहाणा ॥ ९ ॥
हांसता हांसता बोले हृषिकेश तया असे ।
मध्ये जो दोन सैन्यांच्या विषण्णा बनुनी बसे " ॥ १० ॥

कृष्ण–

" नको ती तू रडीं गासी, बाता पंडितिच्या सवे ।
जित्या-मेल्या-विशी नाही. पंडिता येत आसवे ॥ ११ ॥
झालो न मी, तसा तू, ना वा ना भूपति एवढे ।
ना हे खरे 'न होणार', सर्व आपण यापुढे ॥ १२ ॥
देहीं या प्राणियांच्या जैं बाल्य, तारुण्य, वृद्धता ।
येति-जाती शरीरे तैं, तेथ ना चळ धीमता ॥ १३ ॥
विषयस्पर्शी निर्मी कीं थडी, ऊन, दुखी सुख ।
येति-जाती अनित्ये तीं, भारता, होइ सोशिक ॥ १४ ॥
त्यांचे कांही न चाले ज्या नरश्रेष्ठ नरापुढे ।
सारखी त्या सुखें दुःखें, धीर मोक्षास तो चढे ॥ १५ ॥
'नाही' चे 'होय' होईना, 'होय' चे हो न 'नाहि'से ।
निश्चिती उभयांची या जाणकी जाणली असे । १६ ॥
जाण ते अविनाशी तू, ज्याने हे सर्व व्यापिले ।
अक्षयाचा नाश केव्हांही कराया न कुणा जुळे । १७ ॥
शरीरे नाशवन्तें ही, आत्म्याचीं मान्य शाश्वत ।
नाश ना ज्या न मर्यादा, तैं करी युद्ध भारत ॥ १८ ॥
यास मारेकरी मानी, आणि जो मानितो मृत ।
त्या दोघा न कळे कांहीं ! ना मरे हा न मारित ॥ १९ ॥

ना जन्मतो वा न मरे कधीही
झाला न होईल न, हो न कांहीं ।
हा नित्य, हा शाश्वत, हा पुराणा
ना ठार हा हो, जरि देहराणा ॥ २० ॥
जाणे जो यांस ना नाश, जन्म ना मृत्यू ना तसा ।
तो कोणा मारवी, किंवा कोणा मारिल ही कसा ॥ २१ ॥
वस्त्रे जुनी टाकुनि जीर्ण जैशी
नवीन घेतो दुसरी मनुष्य ।
शरीरे जुनी जीर्ण टाकूनि तैशी
दुजी घेत आत्मा निराळीच खास ॥ २२ ॥
याला न छेदिती शस्त्रे, याला विस्तव जाळि ना ।
याला न ओलवी पाणी, याला वाळवि वायु ना ॥ २३ ॥
छेदवे ना वाळवे ना, ओलवे-वाळवे हि ना ।
नित्य, स्थिर, निश्चल हा सनातन कुठे नुणा ॥ २४ ॥
ना दिसू ये न भासू ये, बोलिला निर्विकार हा ।
तरी हा जाणूनी ऐसा तुझा शोक वृथा पहा ॥ २५ ॥
किंवा त्वा मानिले कीं हा सदा जन्मे, सदा मरे ।
महाबाहो, तुझा शोक याविशीं तरी व्यर्थ रे ॥ २६ ॥
जन्मत्याचा खास मृत्यू, मृताचा खास जन्म कीं ।
तरी अटळ जें त्याची, शोभे न तुजला दुखी ॥ २७ ॥
ना कळे मूळ भूताचे, स्पष्ट मध्येच केवळ ।
कळे शेवट ना पार्था, तेथें काय दुखी बळ ॥ २८ ॥
आश्चर्यसा पाहत त्यास कोणी
आश्चर्यसा अन्यहि यास वर्णी ।
आश्चर्यसे ऐकत कोणि त्याचे
ऐकोनिही ध्यानि न हा कुणाचे ॥ २९ ॥

नित्य हा, अमर हा आत्मा, सर्वांच्या देहिं भारत ।
भूतमात्र तयायोगे, तुला शोक न शोभत ।। २९ ।।
स्वधर्मा पारखोनीही, तुला भेणे न शोभते ।
धर्मयुद्धाहुनी नाहीं, क्षत्रिया श्रेय अन्य ते ।। ३१ ।।
अनायासें प्राप्त झाले स्वर्गाचे द्वार मोकळे ।
भाग्यवंत क्षत्रियांना, पार्था, युद्ध असे मिळे ।। ३२ ।।
आणि कर्तव्य हे युद्ध, जरी तू करशील ना ।
सारुनी धर्म-कीर्तीला, पाप घेशील रे पुन्हा ।। ३३ ।।
दुष्कीर्ति आणि गातील तुझी लोक अखंड रे ।
संभावितास दुष्कीर्ति मृत्यूहूनिहि उंडारे ।। ३४ ।।
रणछोड भयें होसी, मानितील महारथी ।
होतास ज्यास सन्मान्य, त्यांचे तू क्षूद्र शेवटीं ।। ३५ ।।
टवाळी फार व्हावयाची, हित-शत्रु-मुखी तुझे ।
विटंबोनी तुझी शक्ति, यापेक्षा दुःख का दुजे ।। ३६ ।।
मेल्याने स्वर्ग लाभेल, जिंकता भोग पृथ्वीचे ।
यासाठी ऊठ कौंतेया, निश्चये युद्ध-सिद्धीचे ।। ३७ ।।
सम मानी सुखे दुःखे, लाभालाभ, जयाजय ।
मग युद्धा वाहुनी घे पापाचा येथ ना लव ।। ३८ ।।
सांख्यात बोलिली तूतें, ऐक योग्यात ठेवण ।
तोडशील जिच्या योगे, कर्माचे पार्थ बंधन ।। ३९ ।।
ना येथ नाश यत्नांचा, ना घडे विपरीत ही ।
अल्पांश याच धर्माचा तारितो संकटी सही ।। ४० ।।
येथे निश्चित बुद्धिची ठाम ठेवण अर्जुन ।
चोंबडयांच्याच बुद्धीचे फाटे फाटेच अंत न ।। ४१ ।।
ती वाणी फुलविलेली अविवेकीच बोलती ।
दुजे नाहीच सांगोनी वेदांच्या वादि रंगती ।। ४२ ।।

कामाकुल स्वर्गलोभी सांगति जन्मुनि करा ।
ऐश्वर्य-भोग-लाभांची, कार्य विस्तर-शर्करा ।। ४३ ।।
ऐश्वर्य-भोग-लुब्धांची तीमुळे भुलती मने ।
बुद्धी न निश्चयी होई स्वस्थ ना समतोलने ।। ४४ ।।
त्रिगुणी बोल वेदांचे, अर्जुना त्या पल्याड हो ।
द्वद्व साही, सत्व राखी, निश्चित-क्षेमसा अहो ।। ४५ ।।
आडात जेवढा अर्थ सर्वत्र भरता जल ।
तेवढे सर्व वेदांचे विज्ञानी ब्राम्हणा फळ ।। ४६ ।।
कर्मांचा अधिकारी तू, फळांचा न कधींच रे ।
हो कर्मफलि ना वेडा, अकर्मी वेड नाच रे ।। ४७ ।।
एकाग्र होऊनि कर्मे करी चटक टाकुन ।
यशा अपेशा ही ग्वाही, योग ते समतोलन ।। ४८ ।।
बुद्धि-योग्याहुनि कर्म फार निकृष्ट अर्जुन ।
बुद्धीचा आसरा घेई फलार्थी बापुडे जन ।। ४९ ।।
बुद्धियुक्त इथे सोडी पुण्य वा पाप हा छळ ।
समत्व जोड यासाठीं; योगकर्मांत कौशल ।। ५० ।।
ज्ञानी समत्व-बद्धींचे कर्माचे फळ सोडिती ।
तोडिती बंध जन्माचे, पदा निर्मळ जोडिती ।। ५१ ।।
जै मोह-कर्मदा बुद्धि ओलांडोनी तुझी सजे ।
साधोक्त चाळणा त्याची-ऐकावे, ऐकिले हि जे ।। ५२ ।।
ज्ञानाने हालली बुद्धी तुझी सुस्थिर राहिल ।
समाधीत ढळेनाशी, तै तुला योग येईल ।। ५३ ।।

अर्जुन-

स्थितप्रज्ञ समाधिस्थ, केशवा तो कसा असे ? ।
स्थितधी तो कसा बोले, कसा हाले, कसा बसे ? ।। ५४ ।।

कृष्ण-

सोडितो कामना जेव्हां मनिच्या सर्व पार्थ, रे ।
स्वतांच्या ठायीं संतुष्ट, स्थितप्रज्ञ तदा ठरे ।। ५५ ।।

उडेना चित्त दुःखांनीं, सुखांची लालसा नसे ।
सोडी लोभ, भय, क्रोधा तो मुनी स्थिरधी असें ॥ ५६ ॥
गुतला न कुठेही जो, बरे येवो बुरे तसे ।
हुराळें ना, उराळे ना, त्याची प्रज्ञा स्थिरा असे ॥ ५७ ॥
इंद्रिये विषयातूनी, अंगे कासव तो जणू ।
सर्वस्व आवरी तेंव्हां, त्याची प्रज्ञा स्थिरा गणू ॥ ५८ ॥
उपाशी सुटती प्राण्या भोग, त्यातिल गोडि ना ।
देखता परमात्म्याला, गोडीच्या नुरती खुणा ॥ ५९ ॥
पार्था, प्रयत्नवादीही विवेकी पुरुषाचिया ।
चित्ता खेचिति वेगाने इंद्रिये ! दांडगींच हां ! ॥ ६० ॥
ती सर्व हाती राखोनि, योगी हो मत्परायण ।
इंद्रिये ज्याचिया हाती, त्याची प्रज्ञा स्थिरासन ॥ ६१ ॥
लागता विषयीं नाद, नरा तत्संग लागतो ।
जन्मे संगातुनी काम, क्रोध कामांत वागतो ॥ ६२ ॥
क्रोधाने होत संमोह, संमोहे भ्रमते स्मृति ।
स्मृतिभ्रंशें बुद्धिनाश, बुद्धिनाशात आहुति ॥ ६३ ॥
रागद्वेषे उणीं ऐशी ज्याच्या हातात इंद्रियें ।
स्वामित्वे विषयी वागे, प्रसन्नत्व तयास ये ॥ ६४ ॥
प्रसन्नत्वे सर्व दुःखे त्याची जाती झडोनिया ।
बुद्धी प्रसन्नचित्ताची लागे शीघ्र स्थिरावया ॥ ६५ ॥
अयुक्तास नसे बुद्धी, अयुक्ता भावना नसे ।
ना शांति भावना–शून्या, अशांता सुख हो कसे ॥ ६६ ॥
इंद्रिये वागता स्वैर, त्यामागे धावते मन ।
ने प्रज्ञेस जसा वारा जळी नाव हिरावुन ॥ ६७ ॥
म्हणोनि इंद्रिये ज्याने सर्वथा विषयातुनी ।
ओढूनी घेतली पार्था, त्याचीं प्रज्ञा स्थिरासनी ॥ ६८ ॥
जी रात्र सर्व जीवांची जागा तेव्हाच संयमी ।
जागती जीव जेव्हां का मुनि द्रष्टा निशा क्रमी ॥ ६९ ॥

आला भराला तरि राखि
समुद्रीं जिरे पाणिच्या पाणि जैसे ।
सारे जिराले जयि भोग तैंसे
परी शान्ति तो खास भोगा–निराळा ॥ ७० ॥
कामना सोडूनि सर्व वागे निःस्पृह जो नर ।
'माझे हे', 'मीच केले', ज्या नुरे तो शांतिचा घर ॥ ७१ ॥
अर्जुना, हीं स्थिति ब्राह्मी, पावता हीं नसे चळ ।
अंतकालीहि लाभे त्या ब्रह्म–निर्वाण केवळ ॥ ७२ ॥
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य कलेपायी शास्त्रे सर्व–समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन–संवादी तत्वार्थी सांख्य नावाचा ।
अध्याय दुसरा सर्वां हो मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय ३

अर्जुन–

थोर कर्माहुनी ज्ञान तरी होय मतें तुझ्या ।
तरीं कां, केशवा, मातें, गोविसी घोर कर्मिया ॥ १ ॥
संदिग्ध भाषणे माझ्या बुद्धीस जणु भारिती ।
तरीं एकच गा सांग, बेणें, श्रेय मिळे मशी ॥ २ ॥

कृष्ण–

दुहेरी या जगीं निष्ठा आधीं मी बोलणो गडया ।
सांख्यानी ज्ञान, जोडोनि, योगियां ॥ ३ ॥

न कर्माच्या अनारंभे नैष्कर्म नर सेवितो ।
किंवा केवळ संन्यासे सिद्धी सुंदर साधतो ॥ ४ ॥
क्षणमात्रहि ना कोणी कर्म सोडोनि राहिला ।
करी कर्म निसर्गाच्या गुणी, प्रत्येक बांधला ॥ ५ ॥
कर्मेन्द्रियास रोधोनि मनीच्या मनि जो खुळा ।
भोगाच्या आठवे बैसे, ढोंगी खोटाच बोलिला ॥ ६ ॥
जो परी इंद्रिया चित्तें नेमुनी पार्थ, आचरी ।
कर्मयोग्यास निःसंग, तया विशिष्टता खरीं ॥ ७ ॥
नेमिलें तू करी कर्म, अकर्मा कर्म थोर ते ।
तुझी शरीरयात्राही कर्मावीण न चालते ॥ ८ ॥
यज्ञार्थी वगळा कर्मे, कर्मा हा लोक बांधला ।
यज्ञार्थ आचरी कर्म सारुनी संग बाजूला ॥ ९ ॥
पूर्वी यज्ञासवे ब्रह्मा प्रजा निर्मी, वदे असा ।
येणे पावाल उत्कर्षा, हा तुम्हां कामधेनुसा ॥ १० ॥
देवा द्या या करीं पुष्टी, देव देवोत ते तुम्हां ।
एकमेका पुष्टी देतां, हिता साधाल उत्तमा ॥ ११ ॥
इष्ट भोग तुम्हां देव यज्ञें तोषोनि देतिल ।
तयांचे त्यांस ना देतां, खाई तो चोर केवळ ॥ १२ ॥
उरीचें यज्ञातील जे खाती ते साधु निर्मळ ।
रांधती आपल्यापुरते पापी खातात तो मळ ॥ १३ ॥
अन्ने संभव भूतांचा, पर्जन्य अन्नसंभव ।
पर्जन्य संभवे यज्ञें, यज्ञ कर्म सुभंव ॥ १४ ॥
निसर्गापासुनी कर्म, निसर्गा ब्रह्म मूळ कीं ।
सर्व ग्रामी सदा ब्रह्म, देई यज्ञात ओळखी ॥ १५ ॥
असे प्रवर्तिले चक्र या लोकीं, जो न चालवी ।
पापी इंद्रियचैनी तो जगे, पार्था, अवाजवी ॥ १६ ॥
परी आत्म्यात जो रंगे स्वयंसंतुष्ट मानव ।
आत्मसंतुष्ट जो होतां, कार्य त्यास नुरे लव ॥ १७ ॥

केल्याने वा न केल्याने लाभ काहीं न त्या इथे ।
गुंतला हेतू ना त्याचा कोण्या भूतामध्यें कुठे ।। १८ ।।
निःसंग होऊनि नित्य करी कर्तव्य यास्तव ।
अनासक्त करी कर्म, पावे कैवल्य मानव ।। १९ ।।
कर्मामुळेंच सिद्धीस पावले जनकादिक ।
लोकसंग्रहीं दे लक्ष, करी कर्तव्य आणिक ।। २० ।।
जे जे आचरतो श्रेष्ठ, तें तेच दुसरे जन ।
मानी प्रमाण जें जें तो, त्यापरी लोकवर्तन ।। २१ ।।
करायाचे मला काहीं, मिळोसे मिळवायचे ।
त्रिलोकात, नुरे तोही वागतसे कर्मि हे रुचे ।। २२ ।।
मीच कर्मीं न वागेन, सोडोनि आळसा जरी ।
येतील माझिया मार्गी, माणसे सर्वतोपरी ।। २३ ।।
हे लोकच उठायाचे, करीं मी कर्म ना जरी ।
होवोनि संकरा मूळ, लोकां या मृतसे करी ।। २४ ।।
अडाणी लोभले कर्मी जैसे साधति अर्जुन ।
साधावे निस्पृही सूज्ञें लोकसंग्रह इच्छुन ।। २५ ।।
अडाणी कर्मनिष्ठांचा बुद्धिभेद करु नये ।
फैलवावी बुधें कर्मे, समत्वें करुनीं स्वये ।। २६ ।।
कर्मे होती निसर्गाच्या गुणांनीं सर्वतोपरी ।
अहंकारामुळे मूर्ख मानतो मीच ती करी ।। २७ ।।
पार्था जो, जाणतो तत्व, कैसे कर्म, कसा गुण ।
तो गुंते मानुनि ती कीं साधतात गुणीं गण ।। २८ ।।
निसर्गाच्या गुणें वेडे गुणकर्मात गुण जे ।
अर्ध्या-मुर्ध्यास सर्वज्ञे चाळा केला न पाहिजे ।। २९ ।।
सर्व कर्मे समर्पोनी मला अध्यात्म वृत्तिने ।
फळाशा, ममता, शोक, टाकूनी लढवी रणे ।। ३० ।।
जे या माझ्या मता नित्य मानूनी वागती जन ।
निर्मत्सरी नि सश्रद्ध, त्या नुरे कर्मबंधन ।। ३१ ।।

जे का मत्सरबुद्धीने, माझे मत न मानिती ।
शाहण्यांचे तेच कांदे संपले ! जाण, दुर्मती ।। ३२ ।।
स्वभावा सारखा वागे आपल्या ज्ञानवंत ही ।
स्वभावावरि जायाचे प्राणी; हो काय निग्रही ।। ३३ ।।
इंद्रियां विषयामाजी गोडी वा वीट आढळे ।
वश होऊ नये त्यास, वाटमारेच आगळे ।। ३४ ।।
गुणा निज ऊणा धर्म, साधिला पाहूणा न, ये ।
स्वधर्मी मृत्यू मोलाचा परधर्मी, भयें भयें ।। ३५ ।।

**अर्जुन–**

कोणाच्या प्रेरणेने हा आचरी पाप मानव ।
जणों इच्छा नसोनीं की वेठिला धरिला नर ।। ३६ ।।

**कृष्ण–**

काम हा, क्रोध हा जो की वाहतसे रजोगुणीं ।
महा खादाड पापिष्ट, वैरी त्यास इथे गणी ।। ३७ ।।
धुराने झाकिला अग्नी, धुळीने जणु आरसा ।
वारेने वेष्टिला गर्भ, तमे हा झाकला तसा ।। ३८ ।।
त्यांने हे झांकिले ज्ञान ज्ञात्यांच्या नित्य-शत्रूने ।
कामरुपी विस्तवाने, ज्याते सर्व उणे-उणे ।। ३९ ।।
इंद्रिये, मन, बुद्धि हे त्याचे आधार मानिती ।
त्यांच्याने झाकुनी ज्ञाना, हा दे आम्त्यास भूल ती । ४० ।।
म्हणोनि इंद्रिया आधीं, पार्था, वश करोनिया ।
ज्ञान–विज्ञान जो नाशी, पाप्या नष्ट करी तया ।। ४१ ।।
बोलती इंद्रिये थोर, मन त्याहुनि थोर ते ।
बुद्धि थोर मनाहुनी, तों हो जे बुद्धिपार ते ।। ४२ ।।
जाणरे बुद्धिपाराने, आवरी आपआपणा ।
वैरी दुर्जय संसारी कामस्वरुप अर्जुना ।। ४३ ।।

भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य–कलेपायी शास्त्रे सर्व–समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन–संवादी 'तत्वार्थ कर्म' नावाचा ।
अध्याय तिसरा सर्वां हो मंगल, व्हायचा ॥ १ ॥

# अध्याय ४

**कृष्ण–**

हा योग अविनाशी मी श्रीसूर्याप्रति बोलिला ।
श्रीसूर्य मनुला बोले, मनू इक्ष्वाकिला भला ॥ १ ॥
ऐशा परंपरेने हा झाला राजर्षिना श्रुत ।
तो योग दीर्घ काळात, पांडवा लोप पावत ॥ २ ॥
तोच मी हा तुला आज योग सांगे पुरातन ।
भक्त तू मित्र माझा कीं हे रहस्यहि उत्तम ॥ ३ ॥

**अर्जुन–**

ऐलाडचा तुझा जन्म, सूर्याचा फार पूर्विचा ।
मानावे हें कसे ? मी कां तू वक्ता आधिचा ? ॥ ४ ॥

**कृष्ण–**

कित्येक जाहले माझे, तुझेही जन्म अर्जुना ।
ठाऊके सर्व ते मातें की परंतप तूस ना ॥ ५ ॥
अजन्मा मी निर्विकारी, जीवांचाही नियंत्रक ।
जन्मे प्रकृति वेढोनी, माझी मायाच साधक ॥ ६ ॥
ज्या ज्या वेळेस धर्माला म्लानता भारतां चढे ।
अधर्मा ऊत ये तेव्हां जन्म घेण्यात मी पुढे ॥ ७ ॥

सज्जना स्वस्थ राखाया, रोखाया कुटिला तमीं ।
कर्तव्यपूर्ति साधाया, जन्मे युग युगांत मी ॥ ८ ॥
जन्म दिव्य कर्म माझे, ज्या जैसे तत्वतः कळे ।
अर्जुना देह जाता त्या पुनर्जन्म न ! मी मिळे ॥ ९ ॥
प्रेम क्रोध भया पार धरोनि मज राहिले ।
बहू ज्ञाने, तपाने कीं युद्ध मत्पद पावले ॥ १० ॥
जे जैसे मोजिती माते, त्या तैसे मीहि मोजतो ।
माझ्या मार्गांपरी येती लोक सारीकडून तों ॥ ११ ॥
वांछिले यश कर्माचे पूजिती दैवते इथे ।
त्वरे मनुष्य-लोकांत यश कर्मातुनीं उठे ॥ १२ ॥
निर्मिले वर्ण मी चारी गुणकर्मानुसार ते ।
जाण कर्त्यास त्यांच्या या अकृते निर्विकार ते ॥ १३ ॥
ना मला डसंती कर्मे, ना मला फळि वासना ।
जो असा ओळखी माते, कर्मी तो बांधलाच ना ॥ १४ ॥
जाणिवेने अशा केली कर्मे पूर्वं मुमुक्षुंनी ।
म्हणोनी तू करी कर्म जसे पूर्वील त्या जनी ॥ १५ ॥
' कसे अकर्म वा कर्म ' कोडे हे जाणत्या पडे ।
ते कर्म सांगतो ज्याच्या ज्ञाने पाप तुझे झडे ॥ १६ ॥
कर्माची ओळखी घ्यावी, विकर्माची ही ओळखी ।
ओळखावे अकर्माही, कर्मांची गती खोल कीं ॥ १७ ॥
अकर्मा पहातो कर्मी, अकर्मी कर्म तो तसे ।
लोकांत तो बुद्धिचा, तोलाचा उरकी असे ॥ १८ ॥
ज्याचे सारेच उद्योग काम-संपन्न-वर्जित ।
ज्ञानाने जळली कर्मे, त्याते मानिती पंडित ॥ १९ ॥
कर्मांच्या फळीं ना वेडा, सदा तृप्त स्वतंत्रसा ।
राहे करीत जो काहीं, ना करी तो मुळी असा ॥ २० ॥
निरिच्छ, संयमी आणि कोणाचे घेइना कदा ।
शरीरेच करी कर्मे, दोष त्या न लगे तदा ॥ २१ ॥

हाती ये त्यांत जो तोषे, सुखी, दुःखी खुले मन ।
यशे अपेशे न चळे, कर्मांचे त्या न बंधन ॥ २२ ॥
मोकळा, संग गेलेला, ज्ञानीं बैठक घे मन ।
यज्ञार्थ जो करी कर्म, त्याचे ते जाय लोपून ॥ २३ ॥
ब्रह्मोद्देशें हवि ब्रह्म, ब्रह्में ब्रह्मांत होमिला ।
ब्रह्मी मिसळले कर्म, तेव्हां ब्रह्मत्व पांवला ॥ २४ ॥
देवयज्ञा तसे कोणी अन्य योगी उपासती ।
ब्रह्माग्नींत तसे कोणी यज्ञे यज्ञत्व जाळती ॥ २५ ॥
कर्णादि इंद्रिये कोणी संयमाग्नीत अर्पिती ।
शब्दादी विषया कोणी इंद्रियाग्नीत होमिती ॥ २६ ॥
सर्व इंद्रियकार्ये वा प्राणकार्ये कुणी कुणी ।
आत्मसंयम योगात टाकी ज्ञाने फुलावुनी ॥ २७ ॥
तपे, द्रव्ये, तसे ज्ञाने साधितीं जे उपासना ।
वेदाभ्यासे, व्रते, तीव्रे, ज्ञानें ते संयमी म्हणा ॥ २८ ॥
अपनांत कोणी प्राण, प्राणामधि अपानही ।
अर्पी रोधोनि दोघाते, प्राणायाम करी मही ॥ २९ ॥
आहार तोडुनि अन्य प्राण प्राणांत होमिती ।
यज्ञ–वेत्ते तसे सारे, यज्ञें दोषास जाळिती ॥ ३० ॥
यज्ञ–शेषामृता घेती, पावती ब्रह्म शाश्वत ।
यज्ञहीना न हा लोक, अन्य कोठोनि भारत ? ॥ ३१ ॥
ऐसे विविध यज्ञांचे सांगे वेद विशेष ते ।
कर्मांनी घडतीं सारे मुक्त तू जाणतांच ते ॥ ३२ ॥
द्रव्ययज्ञाहुनि श्रेष्ठ ज्ञानयज्ञच भारत ।
हो सर्व सर्व कर्मांचा, पार्था, ज्ञानांत शेवट ॥ ३३ ॥
नमस्कारें, चिकीत्सेने, सेवेने ध्यानि घे झट ।
सांगतील तुला ज्ञान ज्ञानी अनुभवामृत ॥ ३४ ॥
जाणतां ते पुन्हा मोह असा होणार ना तुला ।
भूतमात्र तुझ्या ठायीं, माझ्या ये आणि दृष्टिला ॥ ३५ ॥

सर्व प्राण्यामध्ये पापी, शिरोमणिच तू जरी ।
सर्व पापाहुनीं पार ज्ञानाची तुज ने तरी ॥ ३६ ॥
काष्टें भस्म करी तैसा पेटला अग्नि अर्जुना ।
ज्ञानाग्नि सर्व कर्मांचे तैसे भस्म करी दुणा ॥ ३७ ॥
ज्ञानासम नसे कांहीं पवित्र दुसरे जगीं ।
ठायींच मेळवी काळे योगी निपुण ते उगी ॥ ३८ ॥
मेळवी ज्ञान श्रद्धेचा, नित्य–सावध, संयमी ।
ज्ञाने परम शांतीच्या मार्गाते त्वरित क्रमी ॥ ३९ ॥
अडाणी, हीनभक्तींचा संशयी साफ नाहक ।
न हा लोक, न तो लोक, संशयीस नसे सुख ॥ ४० ॥
योगाने झाडिली कर्मे ज्ञाने संशय छेदिले ।
आत्मनिष्ठांस कर्माचे न त्या बंधन राहिले ॥ ४१ ॥
म्हणोनी अंतरी आल्या अज्ञानातुनि संशया ।
ज्ञानखड्गे तोड आधीं, योग साधी, उठी जया ॥ ४२ ॥
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य–कलेपायी शास्त्रे सर्व–समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन–संवादी 'कर्म ब्रह्मार्थ' नावाचा ।
अध्याय चवथा सर्वां हो मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

## अध्याय ५

अर्जुन–

कृष्णा, संन्यास कर्मांचा पुन्हां योगहि वानिसी ।
या मध्यें श्रेय जो एक निश्चये सांग तो मशी ॥ १ ॥

कृष्ण–

कर्मयोग नि संन्यास मोक्षदायक दोनही ।
त्यातही कर्मयोगाची संन्यासाहुनि थोरवी ॥ २ ॥
जाणावा नित्यसंन्यासी ज्या ना द्वेष, न कामना ।
द्वंद्वाच्या वेगळा तो हो, पारखा साफ बंधना ॥ ३ ॥
भिन्न योग नि संन्यास बाले बोलति, ना बुध ।
एकाच्या नीट आचारे दोन्ही होत फलप्रद ॥ ४ ॥
सांख्यांना जो मिळे मान तो योग्यासहि लाभतो ।
एक संन्यास तैं योग पाहे जो तोच पाहतो ॥ ५ ॥
योगावाचुनि संन्यास कष्टसाध्यच रे नर ।
कर्मयोगी स्थितप्रज्ञ पावतो मोक्ष सत्वर ॥ ६ ॥
मना, नि इंद्रिया स्वामी योगी इंद्रिया निर्मळ अंहरी ।
साऱ्यांचा जीव की प्राण, तो अलिप्त जरी करी ॥ ७ ॥
'न काहीं मी करी' मानी योगी तत्वज्ञ जो असे ।
पाहे, ऐके, शिवे, हुंगे, खाई, जाई, निजे, श्वसे ॥ ८ ॥
बोले, सोडी, धरी, झांकी पापणी उघडी तरी ।
इंद्रियें विषयीं त्यांच्या वागति जाण ही परी ॥ ९ ॥
ब्रह्मी समर्पुनि कर्मे संग सोडुनि जो करी ।
पापाचा स्पर्श ना त्या जैं, पद्म–पत्र जलांतरी ॥ १० ॥
देहें, मनें नि बुद्धिने, इंद्रियांनीहि केवळ ।
निःसंग करिती कर्मे योगी व्हायास सोज्वळ ॥ ११ ॥
योगी कर्मफळा टाकीं, मेळवी शान्ति निश्चळ ।
अयुक्त स्वैरवृत्तीने फळा लोभोनि बांधला ॥ १२ ॥
सर्व कर्मे मने सोडी, सुखाने संयमी असे ।
नवद्वार–पुरी आत्मा करी ना, न करवीतसे ॥ १३ ॥
ना कर्तेपण, ना कर्मे लोकांची प्रभु निर्मितो ।
ना कर्मी फळसंयोग, स्वभावें परि होत तो ॥ १४ ॥

ना घेई पाप कोणाचे आणि पुण्यहि तो विभु ।
अज्ञाने झांकिले ज्ञाना तैं जीवा मोह-भू ॥ १५ ॥
आत्मज्ञाने परी ज्यांचें गेले अज्ञान त्यास ते ।
त्यांच्या सूर्यासमान ज्ञाने परब्रह्म प्रकाशते ॥ १६ ॥
बुद्धीने नि मनाने जे निष्ठेने त्यांस वाहिले ।
पुन्हां न येति माघारे कीं ज्ञाने पाप संपले ॥ १७ ॥
विद्या-विनय-संपन्न ब्राह्मण, गाय तसा करी ।
सारखे श्वान, चांडाळ, पडिता नजरेवरी ॥ १८ ॥
येथेच जिंकिती जन्म समत्वी स्थिर चित्तींचे ।
निर्दोष स्थिर ते ब्रह्म, ते ब्रह्मीं स्थिर खात्रिचे ॥ १९ ॥
ना हर्षे इष्ट लाभाने, ना खचे, ये अरिष्ट तो ।
ब्रह्मवेत्या नसे मोह, ब्रह्मीं सुस्थिर-बुद्धि तो ॥ २० ॥
विषया विटला जाणे अंतरी सुख काय ते ।
ब्रह्मी मिसळला त्याला, सुख अक्षय लाभते ॥ २१ ॥
इंद्रिय-प्राप्त जे भोग ते दुःखास मात्र, कारण ।
आरंभ, अंतही त्यांना शाहणा देत ना मन ॥ २२ ॥
सोसू शकेच जो येथे देह त्याग न जोवर ।
कामक्रोधातले वेग, तो योगी, तो सुखी नर ॥ २३ ॥
अंतः सुखी नि आनंदी अंतरी ज्या प्रकाश ये ।
ब्रह्म होवोनि तो योगी ब्रह्मनिर्वाण हो स्वयें ॥ २४ ॥
लाभते ब्रह्मनिर्वाण ऋषीला पाप संपल्या ।
निःशंक, संयमा साऱ्या जीवांच्या हिती रंगल्या ॥ २५ ॥
काम-क्रोधाहुनि दूर संन्यासी ज्या-करीं मन ।
चोहोकडेसी आत्मता ब्रह्मनिर्वाण दर्शन ॥ २६ ॥
विषया ब्रह्म लोटोनि दृष्टी भ्रूसंगमी ।
नासापुर-विहारी त्या प्राणपानास आवर ॥ २७ ॥
घालुनि मुनि मोक्षार्थी, इंद्रियें, बुद्धि जो मन ।
सोडी इच्छा, भय, क्रोध, सदा मुक्तच तोपण ॥ २८ ॥

भोक्ता यज्ञ तपांचा मी सर्वलोक–महेश्वर ।
सोयरा प्राणिमात्रांचा जाणे त्या शांतिचा घर ।। २९ ।।
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य–कलेपायी शास्त्रे सर्व–समन्वया ।।
श्रीकृष्णार्जुन–संवादी ‘कर्म सन्यास’ नावाचा ।
अध्याय पाचवा सर्वां हो मंगल, व्हायचा ।। १ ।।

卐

# अध्याय ६

कृष्ण–

कर्मफलीं न राहोनी कर्म कर्तव्य जो करी ।
संन्यासी तो, तोच योगी ‘ना देई जो नि ना करी’ ।। १ ।।
संन्यास बोलती ज्याला योग तो जाण अर्जुना ।
संपल्या सोडल्यावीण योगी कुणीच होईना ।। २ ।।
मुनींचे चढत्या योगी कर्म साधन बोलिले ।
योगीं चढलिया त्याचे शम साधन बोलिले ।। ३ ।।
जेव्हां न विषयीं गुंते गुंते कर्मीं न जेधवा ।
सोडी सर्वच संकल्पा योगारुढच तेधवा ।। ४ ।।
उंचवावे स्वतालागी खालवावे न कीं स्वतां ।
स्वतांचाच स्वतां भाऊ, स्वतांचा शत्रुही स्वतां ।। ५ ।।
स्वतांला जो स्वये जिंकीं, स्वताचा होय भाऊ तो ।
स्वतांला सोडिता स्वैर स्वतांचा होय शत्रु तो ।। ६ ।।
जितात्म्या त्या प्रशांताला दिसे ब्रह्म समाविले ।
थंडी-उन्हां, सुखी-दुःखीं, पुजनीं फजित्यां, भले ।। ७ ।।

तोषला ज्ञानविज्ञाने इंद्रिया जिंकुनि स्थिर ।
सोने, माती नि लोखंड एक ज्या 'युक्त' तो नर ॥ ८ ॥
सखा, मित्र, उदासीन, शत्रु, मध्यस्थ, बांधव ।
साधु, पापी असो कोणी, एक लेखी सुगौरव ॥ ९ ॥
सारखा गुंग हो योगी एकान्तीं राहुनि स्वतां ।
एकबुद्धि, मनोराया, वासना-भोग टाकितां ॥ १० ॥
पवित्र स्थानि घालोनि आसन स्थिर आपले ।
उच ना, फार ना खालीं, कुश-चर्म पटातले ॥ ११ ॥
तेथे आसनि बैसोनी एकाग्र मन ठेवुनी ।
चित्तेंद्रिय-क्रिया वारी स्वशुद्धी योग-साधनी ॥ १२ ॥
देह, मान, सिधे डोके अचल, स्थिर ठेवुनी ।
नासिकाग्रीं निजा दृष्टीं भोंवतालीं न देउनी ॥ १३ ॥
प्रसन्न, शांत, धीराचा, ब्रह्मचर्यव्रतीं स्थिर ।
आवरोनि मना राहे योगी मच्चित्त मत्पर ॥ १४ ॥
असा योजी स्वतां योगी आत्मा आवरित्या मनें ।
मेळवी माझियां ठायीं शांति जी मुक्तिलाच ने ॥ १५ ॥
खादाडाला न हा योग कीं खाणे टाकल्या न हा ।
अतिझोपाळला नाहीं, अतिजाग्यास नाहीं हा ॥ १६ ।
मिताहारी-विहारी जो विवेके कार्यि हालतो ।
जागतो, झोपतो नेमे दुःखि त्या योग पाळतो ॥ १७ ॥
नेमले हे चित्त जेव्हां आत्मरुपींच पाहातो ।
टाकितो कामना सर्व, तेव्हां बोलति योगी तो ॥ १८ ॥
निवाऱ्याचा दिवा जैसा ना चळे, तुलना स्मरे ।
तैसे आत्मानुसंधानीं योग्याचे चित्त हो बरे ॥ १९ ॥
जेथ कीं थबकते चित्त योगाभ्यासे निरोधिले ।
होत भेटोनि आत्म्याते स्वये अंतर तोषले ॥ २० ॥
अमर्याद जिथे सौख्य बुद्धिग्राह्य अतींद्रिय ।
मेळवी आणि ना भ्रष्ट ब्रह्मापासुनि हो लव ॥ २१ ॥

लाभतां जो दुजा लाभ मानि ना थोर त्याहुनी ।
मोठ्या दुःखहि ना हाले, राहिल्यावरी जेथुनी ॥ २२ ॥
जाणावा योग तो जेथें दुःख-स्पर्शा वियोग रे ।
निश्चये योग साधावा तो मनें धीरगंभिरे ॥ २३ ॥
संकल्पी उठल्या इच्छा साऱ्या पार झुगारुनी ।
मनाने इंद्रिये सारी रोधोनि सर्व बाजूनी ॥ २४ ॥
हळू हळू पाठि व्हावे धैर्यधारक बुद्धिने ।
आत्म्यांत मन ठेवोनीं, सोडुनी सर्व चिंतने ॥ २५ ॥
जेथ जेथोनि उंडारे मन अस्थिर चंचळ ।
तेथ तेथेच लावावे आत्मचिंतनीं केवळ ॥ २६ ॥
प्रशांतचित्त हा योगी ज्याचा शून्य रजोगुण ।
होतो ब्रह्मचि निष्पाप सुखा उत्तम पावुन ॥ २७ ॥
योगी ऐसें स्वतःला जो सदा दोष धुवोनिया ।
अनायसेच तो योगी भोगी ब्रह्मपदा तया ॥ २८ ॥
सर्व भूतांमध्यें आत्मा, भूते आत्म्यात सर्वही ।
सर्वत्र समदृष्टीचा योगयुक्त बघे सही ॥ २९ ॥
व्यापी मी, सर्व, जो, पाहे, सारे माझ्यात संचरे ।
अंतरे ना तयाते मी, माते तोही न अंतरे ॥ ३० ॥
सर्वभूतस्थिता माते भजे एकत्विचा स्थिर ।
जरी सारीकडे वागे, करी योगी मला घर ॥ ३१ ॥
आपणासम सर्वत्र अर्जुना, सर्व पाहतो ।
अहो सौख्य, अहो दुःख मानिला श्रेष्ठ योगी तो ॥ ३२ ॥

अर्जुन-

जो हा योग तुझ्या तोंडीं साम्याचा मधुसूदना ।
दिसेना की त्या ठिकाणा माझ्या चंचलशा मना ॥ ३३ ॥
चित्त चंचल कीं कृष्णा, क्षोभकारी, बळी, दृढ ।
आळा त्यास, मला वाटे, वाऱ्याच्या सम वातड ॥ ३४ ॥

कृष्ण-

नि:संशय महाबाहो, वांड हे मन चंचल ।
सरावाने परी येई वैराग्ये हाति केवल ।। ३५ ।।
मना आळा न ज्याच्या त्या योग दु:साध्य मन्मते ।
साध्य संयमवंता तो उपायं जरि तो झटे ।। ३६ ।।

अर्जुन-

नाहीं यत्न असे श्रद्धा, योगाहून ढळे मन ।
तो मुके योंगसिद्धाला-त्याची वाट कशी पण ? ।। ३७ ।।
कीं तो दोन्हीकडे वाया छिन्नाभ्रापरि संपला ।
ब्रह्माच्या पाया वेडा हा रुळलाच न जो मुळी ।। ३८ ।।
माझ्या या संशया कृष्णा, पार काढच खोडून ।
संशया या खंडणारा ना मिळेच तुझ्याविण ।। ३९ ।।

कृष्ण-

न या लोकीं, न त्या लोकीं, पाथा नाश तया असे ।
कुणी कल्याणकर्ता, वा, दुर्गतीला न जातसे ।। ४० ।।
लोकांत पुण्यवंतांच्या राहतो दीर्घकाळ तो ।
योगभ्रष्ट, शुचि, श्रीमान् घराण्यामधि जन्मतो ।। ४१ ।।
बुद्धिमान्, योगियांच्या वा कुळी जन्म मिळे तया ।
असा हा जन्म या लोकीं एकदाच धनंजया ।। ४२ ।।
तेथे तो पूर्वजन्मींचा बुद्धिसंस्कार त्या मिळे ।
आणि सिद्ध्यर्थ तेथोनि करी यत्नास आगळे ।। ४३ ।।
पूर्वींच्याच सरावे त्या खेचला जात निश्चित ।
जिज्ञासेनेहि योग्याच्या शब्दब्रह्मास लंघित ।। ४४ ।।
प्रयत्ने झटणारा तो योगी निष्पाप होउनी ।
अनेक-जन्म-सिद्धीनें मोक्षाचा होतसे धनी ।। ४५ ।।
योगी श्रेष्ठ तपस्व्याला, श्रेष्ठ ज्ञान्यासही तसा ।
कर्मठाही श्रेष्ठ योगी, योगी हो, अर्जुना ! कसा ।। ४६ ।।

सर्व योग्यांमधी योगी चित्त ठेवुनि मत्पदा ।
सश्रद्ध भजतो माते, योग्यांचीं तीच संपदा ॥ ४७ ॥
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य-कलेपायी शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'आत्मसंयम' नावाचा ।
अध्याय सहावा सर्वां हो मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय ७

कृष्ण-

जडोनि चित्त माझ्याशी आश्रये योग साधित ।
ऐक कैसा जाणशील समग्र मज निश्चित ॥ १ ॥
विज्ञानासह हे ज्ञान संपूर्ण तुज मीं कथीं ।
जाणत्या जे नुरें येथे जाणण्या अन्य मागुती ॥ २ ॥
हजारो माणसांतूनी सिद्धीसाठी झटे कुणी ।
तत्वता ओळखी मातें प्रयत्नी सिद्धही कुणी ॥ ३ ॥
पृथ्वी, पाणी, तेज वारा, आकाश, मन, बुद्धि ही ।
मीपणा या तऱ्हा आठ माझ्या प्रकृतिच्या सही ॥ ४ ॥
अपरा ही मान माझी, जीवरुपी परा दुजी ।
प्रकृती, अर्जुना, जेणें या जगा धारणा अजी ॥ ५ ॥
या दोन्हींपासुनी भूतें जन्मली, जाण सर्वही ।
या साऱ्या जगताचे मी मूळ, शेवट मी तई ॥ ६ ॥
माझिया वाचुनी अन्य काहीं नाहीं धनंजया ।
माझ्यात सर्व हे साजे सूत्रीं जैं मणिपुंजया ॥ ७ ॥
जलीं मी रस कौंतिया, चंद्र-सूर्यात तेज मी ।
ॐ वेदीं, शब्द आकाशीं, कर्त्तुत्व पुरुषांत मी ॥ ८ ॥

मातींत शुद्धिचा वास कीं आगीतींल आंच मी ।
चैतन्य वस्तुवस्तूंचे तितिक्षा तापसांत मी ।। ९ ।।
सर्वभूतीं जाण पार्था, सनातनच बीज मी ।
विवेक मतिमंतांचा पाणिदारांत पाणि मी ।। १० ।।
बल बलवंतांचे, वासना लोभी जे कमी ।
धर्मानुकूल भूतांचा, भरतर्षभ काम मी ।। ११ ।।
आणि सात्विकी, जे भाव तामसी राजसी तईं ।
माझ्याच पासुनी जाण, ते माझ्यांत, न मी तयीं ।। १२ ।।
तिन्ही याच गुणीं पूर्ण भावीं हे सगळे जग ।
मोहिले नोळखे मातें. त्या जो थोर, न ज्या डग ।। १३ ।।
दैवी ही गुणसंयुक्ता माझी माया दुस्तर ।
कासेस लागले माझ्या, माया ही तरती तर ।। १४ ।।
मला न पुसती मूर्ख, दुराचारी, नराधम ।
मायेने जाण जावोनी आसुरीं भावि ज्या जम ।। १५ ।।
सेविती भरतश्रेष्ठा, हे मला चार सज्जन ।
दु:खी, ज्ञाना भुकेला, स्वार्थी, ज्ञानीहि अर्जुन ।। १६ ।।
ज्ञानी अनन्य भक्तीचा, सदायोगी, तयी वसे ।
अत्यंत प्रिय मी ज्ञान्या, मलाही प्रिय तो असे ।। १७ ।।
उदार हे जरी सारे, ज्ञान्या मी जीविचा धरी ।
राहि तो जोडला माते आदर्श गणुनी सरीं ।। १८ ।।
जन्मजन्माचिया अंतीं ज्ञानी ये मज धावुन ।
वासुदेवच ज्या सर्व थोर, लाभे न धुंडून ।। १९ ।।
इच्छे, इच्छे फुले ज्ञान देव देव करींत ते ।
तो तो नियम पाळोनी, स्वभावाचेच दास ते ।। २० ।।
जो जो भक्त पुजूं पाहे श्रद्धेन रुप-रुप जे ।
त्याची त्याचीं दृढ श्रद्धा कराया स्थिर मी सजे ।। २१ ।।

श्रद्धे त्या जोडलेला तो ध्यास त्याचाच चाहतो ।
साधतो त्यातुनी भोग, निर्माता त्यास मीच तो ॥ २२ ॥
कोती ज्याची मती त्याचे फळ ते हो अशाश्वत ।
देवा पूजक देवांचे, मद्भक्त मज पावत ॥ २३ ॥
'दडला तो खुला झाला' अडाणीं मानिती मला ।
शाश्वतोमत मी त्यांनी, माझा भाव न देखिला ॥ २४ ॥
वेढिलो योग मायेने स्पष्ट सर्वांस मी नसे ।
वेडे हे जन ना जाणे-जन्म मृत्यू मला नसे ॥ २५ ॥
गेले होउन, आहेत आणि होणार अर्जुना ।
जीव ते ठाउके माते, मी न ठाउक तो कुणा ॥ २६ ॥
राग-लोभ-उठावाने, 'हे कां ते?' ऐशिया भ्रमे ।
अर्जुना सर्व जीवांना संसारी वेड आक्रमे ॥ २७ ॥
पुण्यकर्त्या जनांचे ज्या पाप गेले निघोनिया ।
द्वंद्व मोह सुटे नेमें येती भक्तिस माझिया ॥ २८ ॥
सुटायास जरा-मृत्यू आश्रयें झटती मम ।
ते ब्रह्म जाणती सारे, कर्म अध्यात्म कायम ॥ २९ ॥
जीवन-क्रमी उंचीच्या, त्यागी कीं जाणती मला ।
प्रयाण-समयीं सुद्धा, त्यांनी योग साधला ॥ ३० ॥
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'ज्ञानविज्ञान' नावाचा ।
अध्याय सातवा सर्वां हो मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय ८

अर्जुन-

ब्रह्म तें काय अध्यात्म कर्म कीं पुरुषोत्तम ।
अधिभूत कसे ख्यात ? अधिदैव कसा क्रम ।। १ ।।
अधियज्ञ कसा कोण ? या देहीं माधवा इथे ? ।
अंतकाली तुला कैसें निग्रही होत जाणते ? ।। २ ।।

कृष्ण-

जे अक्षर परब्रह्म अध्यात्म निजभाव तो ।
भूते नि भाव निर्मी जो बोलिला त्याग कर्म तो ।। ३ ।।
अधिभूत चळे तें तें, चैतन्या आधिदैव ते ।
अधियज्ञच मी देहीं, देह-भर्त्याचिया इथे ।। ४ ।।
होत आठव माझाच शेवटी देह सोडून ।
जाई तो माझ्या ठायीं काहीं संशय त्यात न ।। ५ ।।
कीं अंतीं आठवे ज्या ज्या भावाच्या देह सोडतो ।
जाई त्या त्याच ठायीं कीं रंगला नित्य तेथ तो ।। ६ ।।
म्हणोनि सर्वही काळी स्मर मला, लढ आणिक ।
अर्पी मन मती, मातें, मिळालासच बेशक ।। ७ ।।
विवेकें रमल्या चित्तें, अभ्यासी नान्य लक्षुनी ।
पावतो पुरुषश्रेष्ठा दिव्य संतत चिंतुनी ।। ८ ।।
कवी पुराणा सकलज्ञ कर्ता
सूक्ष्माहुनी सूक्ष्म तथा स्मरोनी ।
सर्वांस संजीवहि ना कळेसा
आदित्यवर्णी तिमिरा गिळोनी ।। ९ ।।
प्रयाणकाळी स्थिर मानसाने
की भक्तिने योगबळे करोनी ।
भ्रूसंगमी प्राण सुरेख जो ने
परा दिव्य त्या तो पुरुषा प्रमाणी ।। १० ।।

वेदज्ञ जी अक्षरे बोलतात
विरक्त जेथे यति डुंबतात ।
जी इच्छुनी ब्रह्मचारी रहाती
थोडयात सांगे तुज ती रहाटी ।। ११ ।।
लावोनि फाटके सारी, घालोनि हृदयी मना ।
मस्तकीं ठेवितो प्राणा, साधितो योगधारणा ।। १२ ।।
ॐ या एकाक्षरी ब्रह्मा उच्चारें, मजला स्मरे ।
आवरे देहमात्रा तो उत्तमा गतिला बरे ।। १३ ।।
अनन्यचित जो नित्य, निरंतर मला स्मरे ।
एकरुप सदाचा त्या योग्या मी पार्थ, धाम रे ।। १४ ।।
मिळाले मज त्या जन्म पुन्हां दुःखद नश्वर ।
यायचा ना, महात्मे ते थोर संसिद्धीचे बर ।। १५ ।।
ब्रह्मादि लोक हे सारे माघारे घालती असे ।
मिळाल्या मज कौंतेया पुनर्जन्म मुळी नसे ।। १६ ।।
सहस्त्रयुगपावेतो ब्रह्माचा गणती दिन ।
रात्र युगसहस्राची, अहोरात्रज्ञ ते जन ।। १७ ।।
अव्यक्तातुनि हो व्यक्त सर्व जो न हो दिन ।
रात्र होता लया जाती तेथ अव्यक्त साधुन ।। १८ ।।
भूतांचा संच हा सारा होतां होतां लयास ये ।
रात्र येतां न चालोनी प्रकाशें नि दिनासवे ।। १९ ।।
अव्यक्ताहुनि त्या अन्य भाव अव्यक्त शाश्वत ।
जो न नासे जरी भूते सर्वहीं नाश पावत ।। २० ।।
संज्ञा 'अक्षर' अव्यक्ता, आणखी 'परमा गती' ।
जातां, तेथ न हो मागे, माझे परम धाम ती ।। २१ ।।
लाभे अनन्य भक्तीने पार्था, पुरुष थोर तो ।
जयाच्या अंतरी भूतें, जो या सर्वास व्यापितो।। २२ ।।
ना हो योग्या पुनर्जन्म कोण्या काळास हो तसा ।
ठेवितां देह, तो काळ, अर्जुना, सांगतो कसा ! ।। २३ ।।

अग्निच्या वेळि ताऱ्यांच्या दिनाला उत्तरायणीं ।
शुद्ध पक्षांत जाती ते ब्रह्मा ब्रह्मज्ञ लोपुनी ॥ २४ ॥
धूराच्या वेळि अंधाऱ्या रात्रीला दक्षिणायनीं ।
कृष्णपक्षांत जाती ते मागे चंद्रद्युतीहुनी ॥ २५ ॥
जगाने मानले मार्ग हे डोळस आंधळे ।
एकाने चुकतो फेरा, दुजा फेऱ्यांत आदळे ॥ २६ ॥
जो जाणे मार्ग हे दोन्हीं त्या योग्या होय मोह ना ।
योगास जोडिला राहे सदा म्हणूनि अर्जुना ॥ २७ ॥
वेदांत, यज्ञांत, तपांत तैसे
दानात जे सत्फळ दावितात ।
ते सर्व ओलांडुन जाणता हे
योगी चढे श्रेष्ठ पदा मुळात ॥ २८ ॥

भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'ज्ञानविज्ञान' नावाचा ।
अध्याय आठवा सर्वां हो मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय ९

कृष्ण -

विज्ञानासह हे ज्ञान गुह्य गुह्य कधी तुला ।
सिध्या जीवा, जाण याची झाडणारी तुझ्या मळा ॥ १ ॥
राजविद्या, गुह्यराज, हे पवित्र नि उत्तम ।
स्वादा, योग, सुखें साध्य, धर्मसार चिरंतन ॥ २ ॥

नाहीं श्रद्धा मनाची ज्या या धर्मावर अर्जुन ।
मृत्यु-संसार-मार्गी ते मागुते मज सोडुन ।। ३ ।।
ओळखे थांब ऐशा मी सर्व हे व्यापिले जग ।
ठायीं माझ्या सर्व भूते, मी न त्यांच्यात ीं मग ।। ४ ।।
ना वा माझ्यांत भूते हा योग दिव्य पहा मम ।
पाळितो भूतां, जीव गुंते न कीं मम ।। ५ ।।
सदाचा नभींचा वारा सर्वगामी जसा भला ।
माझ्यामधी तशी सारी भूते ऐसे कळो तुला ।। ६ ।।
सर्व भूते जाति माझ्या कल्पांती प्रकृतिप्रति ।
कल्पारंभी पुन्हा सोडी मोकळी मीच पार्थ, ती ।। ७ ।।
हातीं प्रकृति घेवोनी निर्मितो मी पुन्हां-पुन्हां ।
भूतांचा संच हा सारा जो लुळा प्रकृतीविना ।। ८ ।।
ना माते शकती बांधू कर्मे तीं रे धनंजया ।
माझी ठेवण त्या कर्मी उदासीन म्हणोनिया ।। ९ ।।
साक्षीने माझिया निर्मी प्रकृती हे चराचर ।
त्यामुळें जगिं कौंतेया घडामोड भराभर ।। १० ।।
लेखिती तुच्छ मूर्खे ती मानवी देहि या मला ।
सर्वा समर्थसा माझा भाव ज्यानीं न जाणला ।। ११ ।।
वृथा ज्ञानें, वृथा कर्मे, वृथा आशा खुळ्यांचिंया ।
राक्षसीं आसुरी वृत्ती, मोहिनी जडली जयां ।। १२ ।।
महात्मे मज तों पार्थ, दैवी वृत्तीस जोडुनी ।
ध्याती अनन्य भूतांचे मूळ शाश्वत जाणुनी ।। १३ ।।
सदाचे कीर्तनी माझ्या माझ्या यत्नशील दृढव्रती ।
भक्तीने वंदितें माते नित्ययोगी उपासती ।। १४ ।।
दुजे याज्ञिक कीं माते ज्ञानयज्ञें उपासती ।
एकता - भिन्नता विश्वीं फोडिता व्याप पाहती ।। १५ ।।

मीच संकल्प, मी यज्ञ, स्वावलंबन शाक्त मी ।
मंत्र मी, मीच की आज्य, अग्नि मी, आहुतीहि मी ॥ १६ ॥
जगा मी या बाप आई, आजोबा, धारणाच मी ।
जाण मीं पुण्य ॐकार, ऋक्, यजु: सामवेद मी ॥ १७ ॥
गती, भर्ता, धनी, साक्षी, ठाव, आधार, मित्र मी ।
जन्म, जीवन, जीर्णत्व, ठेवा अक्षय, बीज मी ॥ १८ ॥
तापतो मी, खेचतो मी, आणि पर्जन्य सोडितो ॥
मोक्ष मी, मृत्यु मी पार्था, 'आहे' मी 'नाही' मीच तो ॥ १९ ॥
जे शुद्ध कीं वैदिक सोमपाने
जे मागती स्वर्ग मला सुयज्ञे ।
पुण्यांत त्या जोडुनि इंद्रलोक
तेथील ते साधिति सर्व षोक ॥ २० ॥
स्वर्गाते त्या भोगुनि ते विशाला
येती लोकीं, मर्त्य पुण्यांश गेल्या ।
ऐशी निष्ठा वेदिची पाळियेल्या
आकांक्षींच्या येरझारा कपाळा ॥ २१ ॥
अनन्य चिंतुनी माते पार्था, जे सेविती मला ।
त्या नित्य वाहित्यांचा मी योगक्षेमच वाहिला ॥ २२ ॥
जे दुजा पूजिती देवा श्रद्धापूर्वक भक्त रे
पूजिती तेही कौंतिया, मलाच चुकिच्या भरे ॥ २३ ॥
भोक्ता मी सर्व यज्ञांचा, स्वामी आणिक मी तसा ।
नेणति तत्वता माते; त्या ये पतनिचा वसा ॥ २४ ॥
देवा देवव्रती ये ती, पितरांचे भक्त त्यांप्रती ।
भूतपूजक भूतांना, मद्भक्त मज भेटती ॥ २५ ॥
पान वा फूल जो प्रेमे वा जळ दे मला ।
सेवी मी निर्मळाचा त्या आहेर प्रेमे जाहला ॥ २६ ॥
अर्जुना, करिसी जे जे, भोगिसी, होमिसी तसे ।
देसी, आचरसी, ते ते अर्पी मातेच बा कसे ॥ २७ ॥

शुभाशुभ फळी ऐसा कर्मबंधास वेगळा ।
योग-संन्यास साधोनि माते मिळसि मोकळा ।। २८ ।।
सम मी सर्व भूतांना, द्वेष्य ना मज ना प्रिय ।
प्रेमाने भजती माते, मन्मय तें, मीहि तन्मय ।। २९ ।।
जरी मोठा दुराचारी एकचित्ते भज मला ।
साधूच त्या गणावा कीं त्याचा निश्चय हो मला ।। ३० ।।
शीघ्र, तो होय, धर्मात्मा, मेळवी शांति पावन ।
निश्चये जाण कौंतेया, माझ्या भक्तास नाश न ।। ३१ ।।
माझा आश्रय घेवोनी पाप योनिहि जे जन ।
स्त्रिया, वैश्य, तसे शूद्र, मोक्षाचे त्या मिळे धन ।। ३२ ।।
पुण्य ब्रह्मर्षि, राजर्षि, भक्ताची का वदो कळा ।
अनित्य असुखी लोकीं येता, माते, भजे मला ।। ३३ ।।
माझ्याच मनिचा होई भक्त माझाच पूजक ।
नमस्कारी मला येसी, वाहिला मज साधक ।। ३४ ।।

भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ।।
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'राजगुह्य'च नावाचा ।
अध्याय नववा सर्वां हो मंगल, व्हायचा ।। १ ।।

卐

## अध्याय १०

कृष्ण-

महाबाहो ऐक माझे पुन्हां वचन उत्तम ।
कीं तुला गोड झालेल्या, सांगे मी हित लक्षून ।। १ ।।

ना देव जाणती माझे निर्माण ना महर्षिही ।
सर्वथा मूळ देवांचे, महर्षींचेहि मी सही ।। २ ।।
जाणे जो मी अजन्मा कीं स्वयंभू जगदीश्वर ।
खुळावला न या लोकी, पाप लावी न त्या कर ।। ३ ।।
बुद्धि, ज्ञान, चिकित्सा-धी, शम, सत्य, क्षमा, दम ।
सुख, दुःख, जन्म, मृत्यू, भय वा अभय ते पण ।। ४ ।।
अहिंसा, समता, तोष, तप, दान, यशायश ।
माझ्याचपासुनी भाव भूतांचे भिन्न ज्या कस ।। ।।
महर्षि सात पूर्वीचे, चौघे मनुहि ते तसे ।
माझे संकल्पिले भाव ज्या लोकीं ही प्रजा असे ।। ६ ।।
हा विस्तार तसा योग तत्त्वतां ज्या कळे मम ।
योग निष्कंप तो पावे, काहीं संशय येथ न ।। ७ ।।
सर्वांचे मूळ मी, सर्वा, माझ्याहुनि प्रवर्तन ।
राहणे हे ओळखोनी, मातें सेवति गुंगुन ।। ८ ।।
चित्ते एक मशी प्राणे एकमेकांस बोधिती ।
गोष्टी सांगति माझ्याच, सदा तोषति, रंगती ।। ९ ।।
त्यांतुनी रगल्या नित्य प्रीतिपूर्वक पूजकां ।
भेटी हो मज जेणे दे बुद्धियोगच मीं निका ।। १० ।।
करोनी करुणा त्याची, अज्ञान पोटिंचा तम ।
तेजस्वी ज्ञानदीपे मी घालवी एक हेउन ।। ११ ।।

**अर्जुन-**

मोक्षधाम परब्रह्म सर्वातीत पवित्र तू ।
नित्य आत्मा, आदिदेव, अजन्मा, विभु, दिव्य तू ।। १२ ।।
ऋषि सर्व तुला गाती, तैसा देवर्षि नारद ।
असित, देवल, व्यास-तू स्वतां सांगसी मज ।। १३ ।।
मानिजे सर्व हे सत्य, मला कथिसी केशवा ।
भगवन् कळे तुझें रुप ना देवा वा न दानवा ।। १४ ।।

तुझा तूच स्वतालागी जाणसी पुरुषोत्तमा ।
जगन्नाथा, देवदेवा, भूतेशा, भूतभावना ॥ १५ ॥
विभूति आपल्या दिव्य संग, बाकी न ठेवता ।
लोक हे ज्या विभूतीने व्यापुनि राहसि स्वता ॥ १६ ॥
कैसे जाणू तुला योग्या, सदा मी चिंतचिंतुनी ।
कोण्या कोण्या नि रुपांनी माझ्या येशिल तू मनी ॥ १७ ॥
विस्तारे आपला योग, विभूतीही जनार्दना ।
पुन्हा सांगे, सुधेला त्या ऐकता मज तृप्ति ना ॥ १८ ॥

कृष्ण-

बरे मी सांगतो तुतें विभूती दिव्य माझिया ।
प्रधानत्वे पार्थ, नाही विस्तारा अंत माझिया ॥ १९ ॥
मीच आत्मा गुडाकेश, सर्व भूतांतरी वसे ।
भूतांचा आदि मी, मध्य तसा अंतहि मी असे ॥ २० ॥
आदित्यातिल मी विष्णु, झोत-फेक्यात सूर्य मी ।
मरीची मुख्य वायूंत, नक्षत्रीं, आणि चंद्र मी ॥ २१ ॥
वेदांत मी सामवेद, असे देवांत इंद्र मी ।
मन मी इंद्रियाम जी, चेतना प्राणियांत मी ॥ २२ ॥
आणि शंकर रुद्राचा, यक्षरक्षा कुबेर मी ।
अग्नि मीच वसूमाजी, मेरु की पर्वतात मी ॥ २३ ॥
पुरोहितांत मी मुख्य, जाण पार्था, बृहस्पती ।
सेनापतींत मी स्कंद, मी समुद्र जलाशयी ॥ २४ ॥
भृगु मी महर्षीमाजी, शब्दीं ॐकार एक मी ।
जप मी सर्व यज्ञांत, हिमाद्रि स्थावरांत मी ॥ २५ ॥
मी पिंपळ झाडाचा देवर्षिमाजि नारद ।
मी चित्ररथ गंधर्वी सिद्धीं कपिलसा बुद्ध ॥ २६ ॥
उच्चैश्रवाहि घोड्यांचा, अमृतोद्भव जाण मी ।
ऐरावत गजेंद्राचा, राजा आणि नरांत मी ॥ २७ ॥

आयुधांमाजीं मी वज्र, गाईंची कामधेनू मी ।
उत्पत्ति हेतु मी काम. सर्पांच्या वासुकीच मी ।। २८ ।।
अनंत मीच नागांचा. वारिणांत वरुण मी ।
पितरीं अर्यमा तो मी, यम संयमशीली मी ।। २९ ।।
प्रल्हाद आणि दैत्यांचा, मोजणारांत काळ मी ।
पशूंचा सिंह मी आहे, पक्ष्यांमाजी गरुड मी ।। ३० ।।
वेगवंतात मी वारा, शस्त्राधाऱ्यांत राम मी ।
मीच मकर मत्स्यात, गंगा सर्व प्रवाही मी ।। ३१ ।।
सृष्टीचे पार्थ, मी मूळ, मुख मी, ओघ तोहि मी ।
विद्यांत आत्मविद्या मी, वक्त्यांचा तत्ववाद मी ।। ३२ ।।
अकार अक्षरांमाजी, असे द्वंद्व समासिं मी ।
मी अक्षर तो काळ, विश्वकर्ता विराट मी ।। ३३ ।।
लुटारू सर्वथा मृत्यू, व्हावयांच्यात जन्म मी ।
त्रियांत वाणि, कीर्ती, श्री, क्षमा, मेधा, धृती, स्मृति ।। ३४ ।।
सामांत मी बृहत्साम, गायत्री-मंत्र-सार मी ।
मार्गशीर्ष मासांचा, वसंत ऋतुमाजि मी ।। ३५ ।।
द्युत मी कपटयांमाजीं तेजस्व्यातील तेज मी ।
जय, निश्चिय की आहे, सात्विकातील सत्व मी ।
वासुदेवच वृष्णींचा, पांडवांत धनंजय ।
मुनींचा मुनि मी व्यास, कवींचा कवि भार्गव ।। ३७ ।।
मी दंड शिस्तराख्याचा, जयेच्छूतिल नीति मी ।
गुह्य गोष्टींत मी मौन, ज्ञात्यांचे ज्ञान शुद्ध मी ।। ३८ ।।
तसेच सर्व भूतांचे बीज जे, तेहि पार्थ, मी ।
चराचरांत ना काहीं, लेश की ज्यांत नाहिं मी ।। ३९ ।।
माझ्या दिव्य विभूतींना अंत ना नरकेसरी ।
हा विस्तार विभूतींचा केला मी वानगीपरी ।। ४० ।।
जी जी समर्थशी वस्तु, लक्ष्मीवंत उदात्त वा ।
ती ती जाण, असे झाली तेजोशांतुनि माझिया ।। ४१ ।।

फार ते काय ? सांगावे तुज अर्जुना ।
एकांशे विश्व हे सारे, व्यापुनी उरलो पुन्हा ॥ ४२ ॥
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'रुप-विभूती' नावाचा ।
अध्याय दाहावा सर्वां हो मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय ११

**अर्जुन-**

करोनी करुणा माझी थोर अध्यात्म गुह्य जे ।
बोलिले त्वा तया शब्दे माझा हा मोह जाइजे ॥ १ ॥
उत्पत्ति, नाश भूतांचे ऐकिले मी सविस्तर ।
तुझे अक्षय माहात्म्य तुझ्याद्वारा कळे वर ॥ २ ॥
तसेच वाटते रूप तुझे तू वर्णिसी जसे ।
ईश्वरी ते रूप पाहूं माझिया मनि येतसे ॥ ३ ॥
मनिसी जरि ते शक्य पाहणे रूप मी हरि ।
दावी योगेश्वरा, दावी, शाश्वता आपणा तरी ॥ ४ ॥

**कृष्ण-**

माझी पार्थ, पहा रूपे हजारो-शेकडो तशी ।
अनेकांगी, किती रंगी, दिव्य नानाप्रकारशी ॥ ५ ॥
पहा आदित्य ते रुद्र, अश्विनी, वसु, वायु हे ।
पहा अनेक आश्चर्ये, पूर्वी जी पाहिली नव्हे ॥ ६ ॥

इथें आजभरे पाहे सर्व विश्व चराचर ।
माझ्या देहीं पहा पार्था, तुजला जे पाहणे वर ।। ७ ।।
शक्य ना पाहणे माते डोळयानी याच या तुझ्या ।
दिव्य दृष्टी तुला देतो, सामर्थ्या देख माझिया ।। ८ ।।

संजय-

महायोगे कृष्णे राया, बोलोनि यावरी ।
दाविले रूप पार्थास, थोर उत्कृष्ट ईश्वरी ।। ९ ।।
बहुमुखी, दूरदृष्टि, नवले नव दावता ।
दिव्य कित्येक भूषांचे आयुधे दिव्य धारता ।। १० ।।
दिव्य पुष्पे, दिव्य वस्त्रे, दिव्य गंधानुलेपने ।
आश्चर्ये भरला देव अनंते जगि जीवने ।। ११ ।।
नभीं सूर्य सहस्रांची जरी एकवटे प्रभा ।
तरी त्या थोर देवाच्या प्रभेशीं झोत तो उभा ।। १२ ।।
फाटलेले पार सारे विश्व, एकत्र जाहले ।
शरीरीं देव देवाच्या पार्थे तेव्हांच पाहिले ।। १३ ।।
विस्मये दाटला तेव्हां रोमांचितहि अर्जुन ।
मस्तके नमुनी देवा बोलला हात जोडुन ।। १४ ।।

अर्जुन-

पाहे प्रभो, देव तुझ्या शरीरीं
भूते तशी संघनिहाय सारी ।
पद्मासनीचा प्रभु तो विधाता
सारे ऋषी, दिव्यहि सर्व आता ।। १५ ।।
कितो बाहू, पोटे, मुखे आणि डोळे
तुला पाहतो, नाहि कोठेहि आळे ।
ना अंत, ना मध्य, पुन्हा न मूळ
तुझ्या विश्वरुपीं दिसे विश्वपाळ ।। १६ ।।

हातां गदा-चक्र, किरीट माथा
सर्वा दिशा तेज तुझेंच नाथा ।
ना देखवे तो भवतालि पाहे
सूर्याग्निला ये अतुल प्रभा हे ॥ १७ ॥
तू अक्षर, श्रेष्ठ तू, ज्ञेयही तू
आहेस आधार विश्वा खरा तू ।
तू अव्ययी शाश्वत धर्मपाल
तू पूज्य माते नर सर्वकाळ ॥ १८ ॥
व्यापा मिती ना प्रतापा मिती ना
नेत्रीं शशी-सूर्य, हाता मिती ना ।
पेटे तुझें अग्निने तोंड पाहे
की स्वतेजे जगा तावताहे ॥ १९ ॥
कीं स्वर्ग पृथ्वीतिल अंतराळा
तू एकला सर्वदिशास गाळा ।
हे पाहुनि अद्‌भूत रुप उग्र
त्रैलेक कष्टी प्रभु रे अमाप ॥ २० ॥
हे देव-संघे रिघती तुझ्यात
भ्याले कुणी जोडित हात, गात ।
मांगल्यगीते, ऋषि-सिद्ध-मेळे
तूते किती आठविती सुवेळे ॥ २१ ॥
आदित्य, विश्वे, वसु, रुद्र, साध्य
की अश्विनी, वायु पितृदेव ।
गंधर्व, यक्षासुर, सिद्धसंघ
सारे तुला पाहति विस्मयांग ॥ २२ ॥
प्रचंड रुपे कित्येक तोंडे
डोळे किती, बाहु नि पाय, मांडे ।
पोटे, नि विक्राळ कितेक दाढा
व्याकुळले लोक, नि मीह गाढा ॥ २३ ॥

आकाश-भेदी बहुरंगीलख्ख
आ वाससी ओतित आग आंख ।
पाहे तुला, हो मम जीव गोळा
लागे धृती आणि शांति घोळा ।। २४ ।।
दाढा तुझ्या ती विकराळ तोंडे
कल्पांत-वन्ही दिसतात घेंडे ।
दिङ्मूढ झालो, सुख सापडे न
विश्वस्य देवा, मज हो प्रसन्न ।। २५ ।।
हे आणि सारे धृतराष्ट्रपुत्र
बांधूनि पृथ्वीपति-संघ सूत्र ।
तो भीष्म, तो द्रोण, तसाच कर्ण
कीं आमचे ही रणिचे सुवर्ण ।। २६ ।।
जाती त्वरेनेच तुझ्या मुखांत
भेसूर दाढा, भय जेथ मूर्त ।
दातान्तरी छिन्न नि भिन्न कोणी
दृष्टी भरे कीं चुरल्या शिरांनी ।। २७ ।।
जसे नद्यांचे बहु पाणलोट
समुद्रिच्या पाझरती दिशांनी ।
तसे तुझ्या आग-आग्या मुखात
प्रवेशती हे नरवीर मानी ।। २८ ।।
जसे पेटल्या अग्निमाजी पतंग
करोनी त्वरा खास नाशास जाती
करोनी त्वरा खास नाशा तसेच
तुझ्याही मुखीं लोक धा-धावताती ।। २९ ।।
रे चाटिशी जीभ खाया निघोती
लोकास साऱ्या जळत्या मुखानी ।
ज्या योनितेजे सगळ्या जनाला
भाजे प्रभा उग्र तुझी विशा ।। ३० ।।

मला सांग तू कोण हे उग्ररूपा
नको देवराया, कृपा दे, न कोपा ।
म्हणे ओळखावे तुला आदिदेवा
प्रवृत्ती तुझी आकळेना मला का ॥ ३१ ॥

**कृष्ण–**

मी काळ लोकांतक वाढलेला
जया संहराया इथे पातलेला ।
सारे तुझ्यावांचुनि मृत्युपंथा
मोक्यावरी वीर उभे उभेतां ।। ३२ ।।
म्हणोनिया ऊठ, यशास जोड,
अरी तोड घे राज्य समृद्ध गोड ।
अगाऊच मी मारिले यास पार्थां
निमित्तास हो सर्वथा रे समस्ता ॥ ३३ ॥
द्रोणास, भीष्मास, जयद्रथास,
कर्णास वीरेंद्र, दुजा कुणास ।
मी मारिले, मार, धरी न खेद
झुंजे रणीं शत्रु रणीं शत्रु ठरेल बाद ॥ ३४ ॥

**संजय–**

ऐकोनि हे भाषण केशवाचे
जोडी करा अर्जुन कंपनाचे ।
बोले पुन्हा, वंदुनि साच कृष्णा
दाटे गळा, घे भय दीन तृष्णा ।। ३५ ।।

**अर्जुन–**

कृष्णा तुझे येथिल नाव मोठे
लोटे जगी प्रेम नि हर्ष दाटे ।
की राक्षसे भ्याली, दिशा पळाली
लोटांगणे सिद्ध हरेक घाली ।। ३६ ।।

प्रभो न का हे तुज वंदणार ?
ब्रह्मास तू आद्यकर्त्यास थोर ।
अनंत, विश्वंभर, इंद्रही तू
तू ' होय ' तू, ' नाही ' नि ' पार 'ही तू ॥ ३७ ॥
तू आधिचा देव, चैतन्य मूळ
तू एक आधार विश्वास खोल !
ज्ञाताहि तू ज्ञेयहि मोक्ष-धाम
तू व्यापिसी विश्व अनंतनाम ॥ ३८ ॥
विष्णु, यमाग्नि, वरुणेंद्र की तू
प्रजापिता तू नि पिता तया तू ।
नमस्कार तुला हजार वेळा
पुन्हां, पुन्हां आणि पुन्हांहि केला ॥ ३९ ॥
पुढोनि नमो, मागुनीही तुला रे
नमस्कार सारीकडे, तूच सारे ।
तुझ्या अंत वीर्या नसे माप शौर्या ।
तुझ्या पोटि सारे, तुझा व्याप सर्वा ॥ ४० ॥
सखा मानु मी सलगीत बोले
गड्या, यादवा, कृष्ण असे निभोळे :
तुझा ठाउका हा महिमा न माते
चुकोनि तसे प्रेमभरे हि होते ॥ ४१ ॥
विनोदार्थ केली अवहेलना मी
फिरोनी, निजोनी, बसोनी, चरोनी ।
न एकान्त, लोकान्तहि मानियेला
तयाची क्षमा मागित मी सखोला ॥ ४२ ॥
पिता तू जगा होसि चराचराला
जगा तू गुरु थोर जगा निराळा ।
नसे जोड वा जाड तुला कुणीही
त्रिलोकीं कुठोनी, अतुल प्रभावी ॥ ४३ ॥

म्हणोनि लोटांगण घालुनि मी
प्रसाद मागे तुज पूज्य स्वामी ।
पिता मुलाचे नि सखा सख्याचे
प्रिय प्रियाचे, तई सोस माझे ॥ ४४ ॥
न देखिले देखुनि तेच धालो
भयेहि कष्टी मनि फार झालो ।
मला प्रभो दाखवि तेच रूप
प्रसन्न विश्वंभर होई खूप ॥ ४५ ॥
हातां गदाचक्र, शिरीं किरीट
तैसा बघाया तुज आर्त चित्त ।
चारी करांचे तव रूप घे ते
हजार-हाता जगदेकमूर्ते ॥ ४६ ॥

**कृष्ण-**

आलो खुषींत, तुज आणिक अर्जुना हे
म्या दाविले परमरूप रमोनि भावे ।
ते तेज एकच अनंत निमूळ विश्व
ना देखिले तुजविना एथ जे अपूर्व ॥ ४७ ॥
ना वेद, ना यज्ञ, पढाई, दान,
कर्तुत्व की उग्र तपे करून ।
या रूपि ना मी दिसणे नृलोकी
पार्था, तुझ्यावीण कुणास बा की ॥ ४८ ॥
व्याकूळ ना हो नच होइ वेडा
माझा असा हा बघुनी उफाडा ।
टाकी भया, प्रेमळ आणि चित्ते
माझे पुन्हां रूप पहाच हे ते ॥ ४९ ॥

**संजय-**

ऐसे पार्था बोलुनी वासुदेव

दावी त्याते आपले रूप पूर्व ।
भ्यालेल्या त्या देतसे धीर थोर
होवोनि की सौम्य-देही उदार ॥ ५० ॥

अर्जुन-

पाहुनि हे तुझे रुप मानवी सौम्य माधवा ।
स्वस्थ प्रसन्न चित्ताचा मी ये भानावरी नवा ॥ ५१ ॥

कृष्ण-

अति दुर्लभ दर्शन हे तू माझे पाहिलेस जे ।
देवा देखिल ते रुप पाहण्या नित्य पाहिजे ॥ ५२ ॥
वेदानी ना तपे ना मी दाने, यज्ञे तसे न वा ।
पावणे शक्य ऐसा हा मज जैं पाहिला तुवा ॥ ५३ ॥
तरी अन्यय भक्तीने ऐशा माझेत होतसे ।
तत्वता दर्शन, ज्ञान, पार्था मीलनही तसे ॥ ५४ ॥
कार्य माझे करायाचा, माझ्या सेवेस वाहिला ।
नि:स्पृही, गोड सर्वांचा, पांडवा तो मिळे मला ॥ ५५ ॥
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'विश्वदर्शन' नावाचा ।
अध्याय अकरावा हो सर्वां मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय १२

अर्जुन-

ऐसे नित्य मिळाले जे तुला भक्त उपासती ।
अव्यक्ता अक्षरा की जे योगी निष्णात त्या किती ॥ १ ॥

कृष्ण-

घालोनि मन माझ्यात सदा गुंग उपासती ।
त्याही उत्कट निष्ठेचे योगी श्रेष्ठ मला कृती ।। २ ।।
परी जे ध्यानि ह्या कीं जे ना हाले दाविता न ये ।
सर्वग्रामी आकळेना गूढ, नित्य, स्थिर, स्वये ।। ३ ।।
इंद्रिया लावुनी ओळ, सर्वत्र समबुद्धिचे ।
प्राणिमात्र हितीं वेडे, ते मलाच मिळायचे ।। ४ ।।
विशेषक्लेश त्या कीं जे अव्यक्तीं चित्त गोविती ।
देहवन्तास कष्टाने झांकलेली मिळे गती ।। ५ ।।
परी जे सगळी कर्मे अर्पुनी मजलागुनीं ।
निर्लेप चित्त लावोनी मातें भजती चिंतुनीं ।। ६ ।।
संसार-सागरातूनी मृत्यूचा शीघ्र तारक ।
होय मी सा घालिती जे चित्त माझ्यात बारिक ।। ७ ।।
दे चित्त ठायी माझ्याच, बुद्धी माझ्यात सोड रे ।
माझ्यातच रहाशील, यापुढे किन्तु ही नुरे ।। ८ ।।
ठेवणे आणि माझ्यात चित्त स्थिर न हो तरी ।
मिळायाची मला इच्छा, अभ्यासे एकल्या धरी ।। ९ ।।
अभ्यासहि जमेना तो माझे कार्य धरी करी ।
कर्मे मदर्थ केल्याने, सिद्धि ये तुजला सरी ।। १० ।।
आणि हेही न होई तों माझ्या कार्यास वाहिल्या ।
सर्व कर्मफळा सोडी, स्वये संयम राहिल्या ।। ११ ।।
अभ्यासा श्रेष्ठ हो ज्ञान, ध्यान ज्ञानांत आगळे ।
ध्याना कर्मफलत्याग, त्यागे शांति सरीं मिळे ।। १२ ।।
कोणाचा न करीं द्वेष, स्नेही मृदुच आणखी ।
'माझे-मी' न म्हणे सोशी सुखे-दुःखे दयाळू की ।। १३ ।।
संतुष्ट सर्वदा योगी संयमी दृढनिश्चयी ।
मज दिल्या चित्त-बुद्धीचा भक्त माझा रुचे लयीं ।। १४ ।।

ज्या न कंटाळती लोक, लोकां कंटाळतो जो न ।
प्रिय माते, भयोद्वेगा, हर्षक्रोधा-पल्याड जो ।। १५ ।।
निःस्पृही शुद्ध की दक्ष, उदास व्यर्थ ज्या व्यथा ।
ना कुठें मिरवे माझा तो भक्त प्रिय सर्वथा ।। १६ ।।
हुराळे ना, उदाळे ना झुरे ना, आतुटे हि ना ।
बरे-वाईट सांडी तो भक्त माझा साजणा ।। १७ ।।
एक वैऱ्या आणि मित्रा, तसा मानापमानिही ।
थंडी-उन्हां, सुखा-दुःखा सारखा मोकळा सही ।
निंदा तैशी स्तुती ज्या जो मौनी तुष्ट कशातही ।
स्थिरबुद्धी निराधार भक्त प्रिय मला सही ।। १९ ।।
कर्तव्यामृत हे जो कां सेविती बोलिले तसे ।
श्रद्धेचे भक्त माझे ते थोर अत्यंत जीवसे ।। २० ।।
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ।।
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'परमा भक्ति' नावाचा ।
अध्याय बारावा हो सर्वां मंगल, व्हायचा ।। १ ।।

卐

# अध्याय १३

कृष्ण-

या शरीरास कौंतेया क्षेत्र हे नाव कीं असे ।
ओळखी हे तया तज्ञ क्षेत्रज्ञ म्हणती तसे ।। १ ।।
आणि क्षेत्रात साऱ्याच जाण क्षेत्रज्ञ मीच तो ।
क्षेत्र-क्षेत्रज्ञ बोधी जे ज्ञान ते माझिया मते ।। २ ।।
क्षेत्र कोण, कसे, त्या कां विकार उठले कसे ।

हा प्रभात्र कुणाचा ते, ऐक माझेनि अल्पसे ॥ ३ ॥
ऋषिंनी गाइले अंगी किती मंत्री परोपरी ।
वर्णिले ब्रह्मसूत्रांत सप्रमाण खरोखरी । ४ ॥
महाभतें, अहंकार, बुद्धि अव्यक्त आणि ते ।
इंद्रिये अकरा ही ती इंद्रियार्थहि पाच ते ॥ ५ ॥
इच्छा, द्वेष, सुखे, दुःखे, धृति, संघात चेतना ।
साविकार क्षेत्र दिसे, ही थोडक्यांत विवेचना ॥ ६ ॥
क्षमा, विगर्व, विढोंग, अहिंसा सरळेपणा ।
गुरुंची शुश्रूषा, पुण्य, स्थैर्य, आत्मनियंत्रा ॥ ७ ॥
विषयाविषयी वीट आणि नाहीच मीपणा ।
जन्म-मृत्यु-जरा-व्याधी-दुःख-दोष विचारणा ॥ ८ ॥
वेड ना जोड ना काहा घरा-पोरा-स्त्रियेत्रिशी ।
'हवे' येवो, 'नको' येवो, सदा चित्त तुला जशी ॥ ९ ॥
माझी अनन्य भावाची भक्ति सपूर्ण चोखट ।
एकांती लागते ओढ, लोकांती सर-धोपट ॥ १० ॥
शाश्वत ज्ञान आत्म्याचे तत्वनीय प्रत्यय ।
याला ज्ञान असे नांव दुजे अज्ञान जे नय ॥ ११ ॥
सांगतो जाणवी ते जे अमृतप्राप्ति जाणिल्या ।
वर्णवेना परब्रह्म, 'आहे-नाही' अनादि त्या ॥ १२ ॥
सर्वत्र त्या हात, पाय, डोळे, डोकी मुखे सही ।
सर्वत्र कान राहाती लोका व्यापुनि सर्वही ॥ १३ ॥
इंद्रियांचा दिसे खेळ, मेळ एका न इंद्रिया ।
ना शिवे तो धरी सर्व गुणीं निर्गुण आश्रया ॥ १४ ॥
आंत बाहेर भूतांच्या जे एकच चराचर ।
सूक्ष्मत्वें जाणवेना जे दूर ते जवळीं, बर ॥ १५ ॥
फोडिले ना तरीं भूतीं फोडिल्यापरि र'हते ।
जाणावे-निर्मिते भूते, पाळिते गिळतेहि ते ॥ १६ ॥

तेजाचियात जे तेज अंधारापार बोलिले ।
घ्यावेसे, ज्ञान ये ज्ञाने, जे सर्वा हृदि राहिले ।। १७ ।।
क्षेत्र नि ज्ञान घ्यायाचे, तेही थोडचात बोलिले ।
भक्त माझा जाणुनि हे, माझ्या रुपात ये मिळे ।। १८ ।।
प्रकृती–पुरुषांची ही जोडी जाण अनादिच ।
विकारां नि गुणां आई, प्रकृति जाण निश्चित ।। १९ ।।
कार्य–कारण–कर्तृत्वा निमित्त प्रकृती असे ।
भोक्तृत्वा सुख दुःखांच्या बोलति पुरुषा तसे ।। २० ।।
पुरुष प्रकृतिठायी भोगी प्रकृतीचे गण ।
गुणसंगामुळे त्याते जन्म नीच नि पावन ।। २१ ।।
सर्वसाक्षी, अनुज्ञाता, भर्ता, भोक्ता, महेश्वर ।
बोलती परमात्माही देहीं पुरुष या पर ।। २२ ।।
ऐसे जो पुरुषा जाणे प्रकृतीच्या गुणासवे ।
जेथे जथे असे तोही, तो जन्मा फिरुनी न ये ।। २३ ।।
ध्यानाने हृदयी कोणी स्वये आत्म्यात पाहते ।
दुसरे सांख्ययोगाने, कर्मयोगेंहि अन्य ते ।। २४ ।।
ऐसे न जाणले कोणी ऐकिवाने उपासती ।
आणि ऐकीव पाळोनी मृत्यू मागेंच टाकिती ।। २५ ।।
किती, काहींहि येंऊ दे, जन्मा स्थावर, जंगम ।
क्षेंत्र–क्षेंत्रज्ञ संयोगें होय ते जाण अर्जुन ।। २६ ।।
समत्वे सगळचा भूतीं राहत्या परमेश्वरा ।
अढळा ढासळल्यात पाहे तो पाहतो खरा ।। २७ ।।
सर्वत्र भरून ठेल्या ईश्वरा जो बघे सम ।
स्वतांते ना स्वतां मारी, येणे त्या गति उत्तम ।। २८ ।।
व्हायची सर्वथा कर्मे केवळ प्रकृतीमुळे ।
आत्मा कर्ता नव्हे, हे जो पाहे त्यास खरे कळे ।। २९ ।।

जेव्हां ठायीं बघे एका भूतांचे वेगळेपण ।
पसारा आणि तेथोनी तेव्हां ब्रह्म मिळे पण ॥ ३० ॥
मूळता, गुण ना, तेणे परमात्मा न हा झरे ।
शरिरांत ठरे तोही ना करे, दूर वावरे ॥ ३१ ॥
सूक्ष्म तो न डसे काही नभा सर्वत्र ते जरी ।
देहीं सारींकडे राहे, आत्मा अलग त्यापरी ॥ ३२ ॥
जसा दे एकला सूर्य सर्व लोकां उजेड या ।
क्षेत्रज्ञ तैं उजाळा दे सर्व क्षेत्रास या सया ॥ ३३ ॥
क्षेत्र-क्षेत्रज्ञ भेदा तों ऐसें जे ज्ञान डोळियां ।
भूत-प्रकृति-मोक्षाते जाणेती ब्रह्मि त्या ठिया ॥ ३४ ॥
भाग्याच्या गाडल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्य-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'क्षेत्र क्षेत्रज्ञ' नावाचा ।
अध्याय तेरावा हो सर्वां मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय १४

कृष्ण-

पुन्हा ठसवितो थोर ज्ञान ज्ञानांत उत्तम ।
जाणोनी जे मुनी सारे गेले मोक्षास येथुन ॥ १ ॥
ज्ञात हे जवळी केले झाले माझ्याच सारखे ।
उत्पत्तिकाली तें जन्मा, व्यथे प्रलयि पारखे ॥ २ ॥
माझे क्षेत्र प्रकृति हे, त्यात ठेवीत बीज मी ।
उत्पत्ति सर्व भूतांची, भारता, होत तेथुनी ॥ ३ ॥
सर्व क्षेत्रामध्ये मूर्ती, पार्था, ज्या जन्म पावती ।
क्षेत्रस्वी प्रकृति त्यास बीज-पेऱ्यांत मी कृती ॥ ४ ॥

सत्व, रज, तम ऐसे गुण प्रकृतिची मुले ।
अत्म्यास निर्विकारीं ही तयीं देहास बांधिले ।। ५ ।।
तेथ निर्मळ तो सत्व, तेज आरोग्य सांधतो ।
निष्पापा, सुख-संगाने, ज्ञान संगेहि बांधतो ।। ६ ।।
रज तो वासनारुप ' हपापाचे सिधे फळ ।
आत्म्यास कर्मसंगाने वांधतो, पार्थ, केवळ ।। ७ ।।
अज्ञानी तम जन्मे की आत्म्यां सर्व भुली गण ।
चुका-आळस-झोपानी टाकी तो पार्थ बांधुन ।। ८ ।।
सौख्यात सत्व घाली की रज कर्मात भारत ।
तम ज्ञानास गुंडोनी चुकीच्या भरि घालित ।। ९ ।।
रज तम जिकोनी होतसे सत्व भारता ।
रज सत्वा-तम तैसा तम सत्वा-रजा तथा ।। १० ।।
या देही सर्व अंगांनी उजाळा उमटू बघे ।
जेधवा ज्ञान, जाणावे तेंधवां सत्व हो उभे ।। ११ ।।
' हे करू-तें करू ' होणें लोभ, प्रवृत्ति, लालसा ।
घेती उठाव ही पार्था, रज वाढीस यें जसा ।। १२ ।।
निरुत्साह नि अंधार वेगुमानी नि मोहरे ।
अर्जुना, उठती ही की जेंव्हां का तम मोह रे ।। १३ ।।
सत्वाचा भर त्या वेळी झाल्या प्राणी खलास तो ।
उत्तम ज्ञानियांच्या कीं लोकी निर्मल पावतो ।। १४ ।।
रजाच्या भरि संपे तो कर्म-बेड्यात जन्मतो ।
तमीं बुडुनि मेला तो मूर्ख कोटींत जन्मतो ।। १५ ।।
जाणे सुकृत कर्माचे फळ सात्विक निर्मळ ।
रजाचे फळ ते दुःख, तमा अज्ञान ये फळ ।। १६ ।।
सत्वातून फुले ज्ञान लोभमात्र रजातुनी ।
चुकी, मोह नि अज्ञान घडायाचे तमातुनी ।। १७ ।।

उंच जातात सत्वाचे, मध्ये रहाति राजस ।
दुर्गुणा ठाव देणारे जाताती खोल तामस ॥ १८ ॥
नान्य कर्ता गुणाहूनीं ओळखे देखणा यदा ।
जाणे गुण पल्याडाते, येतो माझिया पदा ॥ १९ ॥
या गुणा तरुनी तीन्ही देहिच्या मूळच्या कुणी ।
जन्म-मृत्यु-जरा-दुःखीं सुटा मोक्षास तो धनी ॥ २० ॥

**अर्जुन-**

लक्षणी कोणत्या तीन्ही या गुणाच्या पल्याडचा ।
शील त्याचे कसे ? तीन्ही या गुणा पार जायचा ॥ २१ ॥

**कृष्ण-**

प्रकाश आणि उद्योग आणि मोहहि पांडवा ।
येता वाटचा रडेना कीं गेल्या राखी न चाड वा ॥ २२ ॥
उदासीनापरी राहे गुणानी जो चळेच ना ।
गुणांचा खेळ हो तेव्हां उभा राहे, हलेच ना ॥ २३ ॥
ज्या शान्ता सुख वा दुःख, माती-सोने जया सम ।
आवडी नावडी धीरा ज्या निंदा-स्तुति वा सम ॥ २४ ॥
मानापमान ज्या नाहीं, न्यायी मित्रा-अरीस वा ।
ना कुठें मिरवे ऐशा गुणातीत गणीत त्या ॥ २५ ॥
मातें चोखट ऐशा जो भक्तिभावेच सेवितो ।
ओलांडून गुणा या तो ब्रह्मरूपास पावतो ॥ २६ ॥
ब्रह्माची हो प्रतिष्ठा मी, अमृताचीही अव्ययी ।
आणि शाश्वत धर्माची, सुखाचो एकसी मही ॥ २७ ॥
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी ' त्रिगुणभाग' नावाचा ।
अध्याय तेरावा हो सर्वां मंगल, व्हायचा ॥ १ ॥

# अध्याय १५

**कृष्ण–**

वरीं मुळे, खोल शाखा, नित्य अश्वथ बोलिला ।
पाने ज्याची बहु ज्ञाने, जाणे वेदज्ञ जो मला ॥ १ ॥
वरी खालति व्यापिती त्यास शाखा ।
गुणी व्यापिल्या, भोग अंकूर ज्या कां ॥
मूळे खालतीही तया लोंबतात ।
नृलोकात कर्मामुळे गुंततात ॥ २ ॥
न येथे तसे रूप लाभे तयाचे ।
न शेंडा, न कीं बूड, ना खोड साचे ॥
रुजाल्या मुळाचाच अश्वथ ऐसा ।
सडेतोड वैराग्यशस्त्रे तुटेसा ॥ ३ ॥
पुढे शोध घ्यावा पदाचा तया की ।
जिथे पावल्याने न माघार बाकी ॥
तया मूळ जावे पुरुषा मिळोनीं ।
प्रकृति पुराणी पसरे जिथोनी ॥ ४ ॥
ना मान–मोद, वरि जिंकुनि संग–दोषा ।
नित्यात्मनिष्ठच जया विटल्यात आशा ॥
ज्या सोडिले सुख दुःखादि विरोधभावी ।
वेडे न ते, चढत अक्षयशा पदांही ॥ ५ ॥
ना त्यास उजळी सूर्य, ना चंद्र, ना विस्तव ।
तेथ गेल्या न येणे हो, ते माझे थोर वास्तव ॥ ६ ॥
माझा अंश संसारी चेतना होय शाश्वत ।
पंचेंद्रियास चित्ताने प्रकृतीतुनी खेचित ॥ ७ ॥
शरीरा पावतो ज्या वा ज्याते ईश्वर सोडतो ।
घेऊनी जाई त्या जैसां वस्तूचा वास वात तो ॥ ८ ॥

कान, डोळा, कातडेही जीभ, आणिक, नाकही ।
तैस मन धरोवी हा भोग भोगी जणे सही ॥ ९ ॥
पार झाला, राहिला ही भोगता गुणयुक्त वा ।
हा न ये ध्यानि वेडयांच्या, दिसे डोळस ज्ञानिया ॥ १० ॥
आणि या प्रयत्नी योगी पाहाती हृदया स्थित ।
दुश्चिन्ताचे अशुद्धात्मे यत्नींही या न पाहत ॥ ११ ॥
सूर्यामधील जे तेज जगा सर्व प्रकाशतें ।
जे चंद्री जे नि अग्नीत माझे की जाण तेज ते ॥ १२ ॥
पृथ्वीत शिरुनी भूते धरी आकर्षणेहि मी ।
वनस्पतीस पोषी मी रसाब्धी सोम होउनी ॥ १३ ॥
मी वैश्वानर होवोनी प्राण्यांच्या देहि फावला ।
प्राणापानासवे चारी अन्नाच्या जिरवी तऱ्हा ॥ १४ ॥
सर्वांचिया मी हृदिं राहणारा
मी कीं स्मृती-ज्ञान-विवेकधारा ।
जाणायचे सर्व वेदीं मलाच
जाणे, करी वेदरहस्य साच ॥ १५ ॥
लोकीं पुरुष ते दोन क्षर आणिक अक्षर ।
क्षर ही सगळी भुतें बोलिले अक्षर स्थिर ॥ १६ ॥
पुरुषोत्तम की अन्य, परमात्मा गणीत तो ।
लोकत्रया प्रवेशोनी ईश अव्यय पाळतो ॥ १७ ॥
मी क्षराच्या पार आणि अक्षराहूनि उत्तम ।
लोकांत आणि वेदांत प्रसिद्ध पुरुषोत्तम ॥ १८ ॥
ऐसे जो शुद्ध धीं जाणे मज कीं पुरुषोत्तमा ।
सर्वज्ञ तो सर्वभावे सेवी मातेच अर्जुना ॥ १९ ॥
अत्यंत गूढ हे शास्त्र बोलिलो निर्मला तुला ।
जाणल्या हे धन्य व्हावा अर्जुना, भला ॥ २० ॥

भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ॥
श्रीकृष्णार्जुन-संवादी ' पुरुषोत्तम ' नावाचा ।
अध्याय पंधरावा हो सर्वां मंगल, व्हायचा ॥ १ ॥

卐

# अध्याय १६

कृष्ण-

निर्धास्ती, चित्तपुण्याई, ज्ञानाची जोड, निश्चय ।
दान, निग्रह अन् यज्ञ, स्वाध्याय, तप आर्जव ॥ १ ॥
अहिंसा, सत्य, अक्रोध त्याग, शान्ति नि सभ्यता ।
दया भूतीं बेहफापा मृदुता, स्थैर्य नम्रता ॥ २ ॥
तेज, क्षमा, धैर्य, शुद्धी, द्रोह ना, गर्व ना मुळी ।
दैवी संपत्ति घेवोनि जन्मल्यालीच ही कुळी ॥ ३ ॥
ढोंग, ताठा, मीपणा, की क्रोध क्रौर्य, आजाण ही ।
कुली की जन्मलेल्यांनी संपदे पार्थ दानवी ॥ ४ ॥
स्वातंत्र्या संपदा दैवी, बधना होय दानवी ।
येशीं दैवे संपदेचा पार्थ, चिंता कशा हवी ॥ ५ ॥
लोकांत ह्या भूतमात्रे द्विधा दैवीं नि दानवी ।
विस्तारे वर्णिली दैव , दानवी ऐक पार्थ, ही ॥ ६ ॥
पुढे व्हावे कुठे ? मागे, नेणती दानवी जन ।
स्वच्छता ना, रीत ही ना आणि त्यांच्यात सत्य ना ॥ ७ ॥
बोलती जग हे खोटे, बिनबुडी, ईश्वराविण ।
लागे कुणी कुणाचे ना, येये स्वार्थच, अन्य न ॥ ८ ॥
ही दृष्टी अंगिकारोनी नष्ट ते पोर बुद्धीचे ।
यैमान घालती शत्रू जगाचे, घोर चालिचे ॥ ९ ॥

स्वैर संचार सेवोनी ढोंगी, ताठर माजले ।
हट्टास पेटुनी वेडचा, नको त्या होत धावले ॥ १० ॥
अपार काळजीचे हे काळापार पुरेलशा ।
चैनी चैनीत ते गुंग, तेवढी तीच त्या दशा ॥ ११ ॥
बांधले लाख आशांनी चैने, चीडे, चटावले ।
मजा मारावया त्याते हवा पैसा मिळो बले ॥ १२ ॥
हे मी कमविले आज हा जोडीन मनोरथ ।
ही आहे, ही हि होईल पुन्हा माझीच दौलत ॥ १३ ॥
तो मारिला शत्रु म्या, दुजेही मारणार कीं ।
मीच ईश्वर मी भोगी, सिद्ध मी, बलवान सुखी ॥ १४ ॥
कुलाचा थोर भाग्याचा मी, माझ्यासम कोण हो ? ।
त्याग, दान करीं मौज, खुळे हे बरळीत हो ॥ १५ ॥
चावळले चुरल्या चित्ते, मोह-जाळचात धावले ।
'मना आल्यामधे' मेले गलिच्छ नरकातले ॥ १६ ॥
स्वतांचे स्तविले ठेले, धने, माने, फुशारले ।
नावाचे करिती यज्ञ दिखाऊ, रीतिने ढिले ॥ १७ ॥
मी पणा शक्ति ताठा कीं आकांक्षा क्रोध नावरे ।
आणि हे मत्सरी माझे देहीं स्वपर चावरे ॥ १८ ॥
क्रूर हेवेखोर ते मी संसारीचे नराधमे ।
फेकितो दानवांच्याच पापी योनित कायम ॥ १९ ॥
पावुनी दानवी योनीं जन्मोजन्मिहि मूर्त ते ।
मला न मिळता जाती उत्तरोत्तर खालते ॥ २० ॥
तिहेरी नरकाचे हे दार मारक आत्म्या ।
काम, क्रोध तसा लोभ म्हणोनि टाक त्या त्रया ॥ २१ ॥
अंतराच्या तिन्ही दारी या जो का मोकळा नर ।
लागला आत्म कल्याणा तेथुनी गति त्या वर ॥ २२ ॥
शास्त्राची शिस्त सांडोनी जो वागे ये तसे मना ।
ना तो पावतसे सिद्धी, सौख्य ना, स्थान थोर ना ॥ २३ ॥

वाटाडया तैं तुला शास्त्र ' करू न करू ' निश्चया ।
सांगी शास्त्रीय जाणोनी येथे काहीं करी जया ।। २४ ।।
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायीं शास्त्रे सर्व-समन्वया ।।
श्रीकृष्णार्जुन-संवादी ' संपदविभाग ' नावाचा ।
अध्याय सोळावा हो सर्वां मंगल, व्हायचा ।। १ ।।

卐

## अध्याय १७

अर्जुन-

शास्त्राची शिस्त सोडोनी श्रद्धापूर्वक पूजिती ।
सत्व कीं रज कीं कृष्णा, तम निष्ठाच काय ती ? ।। १ ।।

कृष्ण-

तऱ्हाचीं तीन हो श्रद्धा प्राण्यांची ती स्वभावता ।
सात्विकी, राजसी, तमसो ऐक ती अतां ।। २ ।।
स्वभावांसारखी श्रद्धा सर्वांची होय अर्जुन ।
श्रद्धेने पूर्ण हा जीव श्रद्धेसा आपल्या जन ।। ३ ।।
देवा पूजिति सत्वाचे रजाचे यक्ष-राक्षसे ।
प्रेते आणि भुते-खंते तमाचे पूजिती तसे ।। ४ ।।
दाबात रेटले घोर, तप ते करिती जन ।
अभिमावास पेटून, काम-ज्ञाने बलावुन ।। ५ ।।
शोषिते धातुरुपाने शरीराच्या, खुळेच ते ।
अतर्यातहीं माते, दानवीं जाण खास ते ।। ६ ।।
खाणे-पिणे हि सर्वांचे तऱ्हाचे तीन लडके ।
तैसे यज्ञ, तपे, ज्ञाने त्यांत हा भेद आसके ।। ७ ।।

आयू, सत्व, बल, स्वास्थ्य वाढवी प्रीति जे सुख ।
रसाळ, गोड, आहार घे स्निग्ध, स्थिर, सात्विक ॥ ८ ॥
कडू, खारे, तिखें, रुक्ष, आम्ल, अत्युष्ण दाहक ।
आहार राजसा गोड जे दे रोग रडे दुख ॥ ९ ॥
बिघडलेले, शिळे झाले, कोरडें, आंबलेच जे ।
उष्टे आणि 'न ये देऊ' तें खाणे तामसा रुचे ॥ १० ॥
कलेच्छा सुटलेल्यांनी मन लावोनि शिस्तिचा ।
कर्तव्य म्हणुनी केला यज्ञ सात्विक, व्हायचा ॥ ११ ॥
जपोनि फळ साधाया ढोंगासाठीहि केवळ ।
होय तो अर्जुना, जाणे, यज्ञ राजस घे बळ ॥ १२ ॥
ना शिस्त वा स निर्माण, विवेकोक्ति न, दान ना ।
निष्ठा सोडून हो यज्ञ, त्याचे तामस लक्षण ॥ १३ ॥
देवा, द्विजा, गुरु, ज्ञात्या सेवा आर्जव शुद्धि ती ।
ब्रह्मचर्य अहिंसा कीं तप कायिक बोलती ॥ १४ ॥
खुपेनासा खरा बोल, हिताचा, गोड जो असे ।
अभ्यास हाति घे त्याचे वाङ्मयी तप होतसे ॥ १५ ॥
उल्हास मनिचा, मौन, स्वयंशासन, सौम्यता ।
शुद्धता भावनांची, हे मनाचे तप तत्वतां ॥ १६ ॥
होयी परम निष्ठेने तिहेरी तप माणसा ।
फलेच्या सुटल्या योग्या हो तें सात्विक की यशा ॥ १७ ॥
सत्कार, मान, पूजाही यासाठी तप दांभिक ।
होत ते बोलले येथे राजस, चंचल, लौकिक ॥ १८ ॥
दुराग्रहेचि जे होय स्वतःचा छळ साधुनी ।
दुज्याते उठवाया वा तप तामस ते गणी ॥ १९ ॥
द्यावे यासाठी हो दान, जे न मिवे करी कुणा ।
स्थानीं, क्षणीं, जनीं योग्य दान सात्विक ते जना ॥ २० ॥

द्यावे परतफेडीने फळावे की कधी तरी ।
ना खुशीने होय दान ते राजस जनांतरी ।। २१ ।।
अस्थानी नि अकाली हो नको त्या दान आणि जे ।
उण्यानीं नि दुगाण्यानी तेच तामस जाणिजे ।। २२ ।।
'ॐ तत् सत्' या त-ा तीन ब्रह्माचा स्पष्ट आठव ।
वेद-ब्रह्मण-यज्ञांचा तयीं मागेच संभव ।। २३ ।।
तरी ॐ या उच्चारे यज्ञ-दान-तपादिक ।
आरंभी हो शास्त्रशुद्ध नेहमीच उपासक ।। २४ ।।
'तत्' उच्चारे मुमुक्षु कीं फळीं दृष्टी न ठेवुनी ।
यज्ञे, दाने, तपे नाना तऱ्हांनी घेत साधुनी ।। २५ ।।
सत्यते-साधुतेसाठी सत् असा शब्द योजिती ।
तैसे सुंदर कर्मास 'सत्' शब्दानेच बोधिती ।। २६ ।।
यज्ञ, दान, तपामध्ये वागणे हे 'सत्' बोलती ।
त्यांच्या साधक कर्मास 'सत्' असे नाव सांगिती ।। २७ ।।
अश्रद्धेने होमिले जे दिले, केले उभे तप ।
बोलिती त्या 'असत्' योगी त्या इथे ना तिथे खप ।। २८ ।।
भाग्याच्या गाइल्या श्रीमान् उपनिषहातून हा ।
जीवनोच्च-कलेपायी शास्त्रे सर्व-समन्वया ।।
श्रीकृष्णार्जुन-संवादी 'श्रद्धा विभाग' नावाचा ।
अध्याय सतरावा हो सर्वां मंगल, व्हायचा ।। १ ।।

# अध्याय १८

**अर्जुन –**

सन्यासाचे महाबाहो जाणू इच्छित तत्व मी ।
त्यागाचेही हृषीकेशा, श्रीकृष्णा, वेगळेपणी ।। १ ।।

**कृष्ण –**

सरणे मर्जिची कर्मे, बुधी सन्यास मानिला ।
सरे ' हेच हवे केल्या ' शोध की त्याग बोलिला ।। २ ।।
दोषसे कर्म टाकावे, विचारी मानिती कुणी ।
यज्ञ – दान – तपाचे ना टाकावे, अन्यही कुणी ।। ३ ।।
तरी त्यागाविषी माझा भारती, एक निर्णय ।
तीन प्रकारचा त्याग सुप्रसिद्ध धनंजय ।। ४ ।।
यज्ञा, दाना, तपा, कर्मा करावे डावलू नये ।
यज्ञे, दाने, तपाने की विचाऱ्या पावनत्वये ।। ५ ।।
तरी देखील ही कर्मे ममत्व फळ सोडुन ।
करावीत असे माझे मत निश्चित उत्तम ।। ६ ।।
नेमल्या तर कर्माचा सन्यास न जुळेलसा ।
लोट मोहामुळे ज्याचा गाजला तमसी असा ।। ७ ।।
' त्रास ' जे म्हणुनी कर्म टाकावे कष्ट भीतिने ।
न होता राजस त्याग त्यागाचा ते फळा न ने ।। ८ ।।
व्हावेचि म्हणुनि का, नेमिले कर्म होतसे ।
फलासक्ति नसे ज्यात, त्याग सात्विक तो असे ।। ९ ।।
उराळे ना बुऱ्या कर्मे बऱ्याने ना हुराळतो ।
सत्वांत मुरला त्यागी निःशंक ज्ञानबुद्धि तो ।। १० ।।
शक्य ना देहवंतास सर्वथा कर्म सोडणे ।
जो का कर्मफला सोडी, तो त्यागी मानिला जने ।। ११ ।।
बुरे बरे भेसळीचे – तिहेरी फळ कर्म घे ।
त्यागहिनास ते लागे, सन्यासा न कुठे बघें ।। १२ ।।

पांच ही कारणे पार्था, घेई तू मजपासुनी ।
बोलिली सांख्यसिद्धांनी सर्व कर्मी यशा गुणी ।। १३ ।।
भूमिका उच्च अन् कर्ता, साधना वेगवेगळी ।
नाना चाली निराळ्याही पांचवे दैव ये मुळी ।। १४ ।।
काया - वाचा - मनाने जे कर्म आरंभितो जन ।
न्यायाचे वा दुजे काहीं, या पाचा त्यास पूरण ।। १५ ।।
ऐसे होय तरी जो का, कर्ता केवल आपणा ।
अपु-या बद्धिने मानी, वेड्याला त्या कळेच ना ।। १६ ।।
का ताठा सुटला ज्याचा, ज्याच्या बुद्धिस लेप ना ।
मारो ती विश्व सारे ही, ना मारी, बांधलाहि ना ।। १७ ।।
जाणत्वे, जाणती, जाण - तीन कर्म प्रवर्तक ।
साधने नि क्रिया, कर्ता, कर्माची तीन साधक ।। १८ ।।
कथिले सांख्यसिद्धांनी कैसे ते घेई ऐकूनी ।
ज्ञान कर्म नि कर्ता हे तिहेरी भिन्न की गुणी ।। १९ ।।
एकभूतीं जये एक भाव देखे सनातन ।
सारख्या - पारक्यामाजीं सात्विक ज्ञान ते गण ।। २० ।।
एकांगे परि जे ज्ञान नाना भाव कितीतरी ।
ओळखी भूत-मात्रात, राजस ज्ञान ते धरी ।। २१ ।।
सर्वस्वी एकल्या जे का कामा फुकट गुंतले ।
कर्मफलासारखे फोल तामस ज्ञान ते भले ।। २२ ।।
आखिले, डसले, तो ना राग - लोभाविना घडे ।
निष्काम वृत्तिने कर्म की ते सात्विक झांजडे ।। २३ ।।
जें का फलाशेने, बढाई मारुनी पुन्हा ।
खटाटोप किती होते मान्य राजस ते जना ।। २४ ।।
निष्पत्ति, वेच, विध्वंस की ना ताकद जोखता ।
मोहे आरंभिले कर्म ते ये तामस सांगता ।। २५ ।।
निःसंग, निरहंकारी, उत्साही, धैर्यधारक ।
यशे - अपयशे न चळे कर्ता तो मान्य सात्विक ।। २६ ।।

फलेच्छ, कर्मिचा वेड, लोभी, अस्वच्छ, बोचक ।
सोवती सुखःदुखाचा, कर्ता राजस लौकिक ।। २७ ।।
स्वच्छंदी, क्षद्र, गर्विष्ठ, कृतघ्न, शठ, आळशी ।
रडचा नित्य नि रेंगाळचा कर्ता तो होय तामसी ।। २८ ।।
बुद्धीचे भेद जे तीन, धृतीचेही गुणामुळे ।
सवं ते सांगतो ऐक, अर्जुना वेगवेगळे ।। २९ ।।
धरू, सोडू, करू, बैसू, पळू, पेलू, कुठे कसे ।
गुंतू, सुटू, चोख जाणे, बुद्धी सात्विय ती असे ।। ३० ।।
पाप, पुण्य, कसे काय ? करावे नि करू नये ।
अपुरे जाणती बुद्धी पार्था, राजस ती स्वये ।। ३१ ।।
पापास पुण्य जी मानी अंधारे व्यापिल्यामुळे ।
उफराटचा गोष्टी तो सार्‍या, बद्धी तामस ती कळे ।। ३२ ।।
धृतीने ज्या मना, प्राणा, इंद्रिया गति देतसे ।
का चोखट समत्वाने धृति सात्विक ती असे ।। ३३ ।।
धृतीने ज्या पुण्य कार्यें मनाची पार्थ चालवी ।
सांधिसाधु, फलेच्छेचा, धृती राजस ती तई ।। ३४ ।।
जिने झोपे, भया – शोका, खेदा, ताठचास् आणखी ।
सोडती ना दुर्मतीचे – धृती तामस पार्थ, की ।। ३५ ।।
आता तीन तर्‍हा सौख्य, ऐक, माझ्याहुनी नरा ।
अभ्यासे जेत गोडी ये, दुःखाचा आटतो झरा ।। ३६ ।।
म्हणोनी विषसे तोंडा, शेवटी अमृतासम ।
सुख सात्विक ते मान्य आत्मज्ञानात ज्या जम ।। ३७ ।।
विषयेंद्रियें संयोगे, तोंडाशी अमृतासम ।
शेवटी विषसे जे कां, सुख राजस ते गण ।। ३८ ।।
तोंडाशी, शेवटी तैसे झट बुद्धीस घेरिते ।
चुकी, आळस, निद्रा ये, सुख तामस ख्यात ते ।। ३९ ।।
तो नसे पृथिवी पाठीं, स्वर्गी देवामध्ये पुन्हा ।
मुक्त कोणी प्रवृत्तीच्या जे अशा तीनही गुणा ।। ४० ।।

विप्र, क्षत्रिय, वैश्यांची, शूद्राचीही धनंजया ।
स्वाभाविक गुणा ऐशी कर्मे वाटिली तया ॥ ४१ ॥
शांती संयम, ऋजुता, क्षमा, तप पवित्रता ।
ज्ञान, विज्ञान, आस्तिक्य, विप्रकर्म स्वभावता ॥ ४२ ॥
रणवेपणा, शौर्य धैर्य, तेज नि दक्षता ।
प्रजारक्षण, दातृत्व – क्षात्रकर्म स्वभावता ॥ ४३ ॥
शेती, व्यापार गोरक्षा – वैश्यकर्म स्वभावता ।
शुश्रुषे होय सेवा ती – शूद्रकर्म स्वभावता ॥ ४४ ॥
आपापल्या दक्ष कर्मीं पूर्णतेला चढे नर ।
स्वकर्मी दक्ष कैसा ये पूर्णते ऐक ते तर ॥ ४५ ॥
भूता उभार जेथोनी जेणे हे सर्व व्यापिले ।
पूजिता त्या स्वकर्माने मानवा पूर्णता मिळे ॥ ४६ ॥
गुणा निजउणा धर्म, साधला पाहुणा न ये ।
स्वभावे नेमिले कर्म करी त्या पाप ना शिवे ॥ ४७ ॥
जन्मता लागले कर्म टाकावे ना सदोषही ।
पाऊला – पाऊला दोष धूर अग्नीवरी जई ॥ ४८ ॥
लालसा ना कुठे ठेवी संयमी, ज्या न वासना ।
संन्यासे थोर त्या सिद्धि जेथे कर्म उरेच ना ॥ ४९ ॥
मिळत्या सिद्धि जे ब्रम्ह, पावे ते बोध ये मम ।
ज्ञानाची थोडक्यामध्यें निष्ठा थोरच अर्जुन ॥ ५० ॥
शुद्ध बुद्धीस जोडोनी धैर्य नेम करोनिया ।
व्याप शब्दादि टाकोनी, फेकुनी राग लोभ वा ॥ ५१ ॥
एकान्ती अल्पसंतोषी, काया – वाचा – मने उगा ।
सदाचा ध्यानयोगात वैराग्याची करी निगा ॥ ५२ ॥
मीपणा, शक्ति कीं ताठा, राग, घेवार, वासना ।
सोडुनी, ज्या न ‘ माझे ’ तो शान्त ब्रह्मपदासना ॥ ५३ ॥
ब्रह्म झाला चिदानदी, बावरे ना, न हावरे ।
दरेका साररखा हो कीं, भक्ति माझी पुरी बरे ॥ ५४ ॥

भक्तीने ओळखी माते तत्वतां, कोण केवढा ।
तत्वता तई जाणोनि लीन माझ्यात त्यापुढा ॥ ५५ ॥
कर्मेही सर्वदा सारी करी मातेच वाहिला ।
कृपेने माझिया स्थाना ठाम शाश्वत पावला ॥ ५६ ॥
मनाने सगळी कर्मे अर्पुनी मज वाहिला ।
बुद्धीचा तोल ठेवोनी हो सदा मज मानला ॥ ५७ ॥
कृपे माझ्या जिवा सर्व संकटापार होशिल ।
मीपणें ऐकसी ना तों नाशा निश्चित जाशिल ॥ ५८ ॥
मी पणा घेऊनी जो तू ' मी न झुंजेन ' घातला ।
आटोप हा तुझा व्यर्थ जुंपील प्रकृती तुला ॥ ५९ ॥
बांधला आपुल्या कर्मे स्वाभाविकच अर्जुन ।
जे करू नेच्छसी मोहे, तुझ्या होईल हातुत ॥ ६० ॥
ईश्वर प्राणिमात्रांच्या पार्था हृदयीं राहतो ।
मायेने यंत्रि घोलोनी चालवी मायेच्याच तो ॥ ६१ ॥
त्यालाच सर्व भावांनी जाई शरण भारत ।
कृपे त्याच्या थोर शान्ति पावशी स्थान शाश्वत ॥ ६२ ॥
बोलिले म्या तुला ज्ञान गुह्य गुह्यातुनी असे ।
ते चिकित्सोनि सर्वांगी करी इच्छेस ये तसे ॥ ६३ ॥
सार सर्वांत मोलाचे वाक्य ऐक पुन्हा मम ।
प्रिय तू निश्चये माझा तैं तुझे शुभ सांगिन ॥ ६४ ॥
हो माझ्या ' मानिचा ' भक्त, पुजारी नम्र हो मला ।
मलाच मिळसी खास, प्रिया, वचन हे तुला ॥ ६५ ॥
सोडुनी सर्व धर्माला, मिळे, ये एकल्या मला ।
नको चिंता! सर्व पापां मुक्त मी करतो तुला ॥ ६६ ॥
हें तू नाही तपोहीन, अभक्ता वा कथायचे ।
ना वा ऐकायचा त्याते, कधी माझे न ज्या रुचे ॥ ६७ ॥
थोर या रहस्या माझ्या भक्ता जो ठसविल की ।
श्रेष्ठ माझा करी प्रेमा, भेट माझी तया निकी ॥ ६८ ॥

त्याहूनि ना जनी कोणी जो माझ्या जीविचे करी ।
व्हावयाचा ना दुजा माझा त्याहुनी प्रिय भूवरी ।। ६९ ।।
आणि अभ्यासिल जो हा पुण्य – संवाद आपला ।
मला वाटे ज्ञान – यज्ञें तयें होईन पूजिला ।। ७० ।।
निर्मत्सरी नि श्रद्धेचा जो कां ऐकेलही नर ।
निर्बंध पुण्यवंताच्या लोका पावेल मंगल ।। ७१ ।।
पार्था, एकाग्र चित्ताने तुवां हे ऐकिलेस कां ? ।
कडाणी ती माझी भूल नाहिशी पार होय कां ? ।। ७२ ।।

**अर्जुन –**

भूल जाई, जाण येई, कृपेने तव अच्युत ।
निःशंक होतसाही मी तुझ्या शब्दास पाळित ।। ७३ ।।

**संजय –**

अशा या वासुदेवाच्या, पार्थाच्या आणि थोरल्या ।
संवादा ऐकिले मी या रोमहर्षक अद्भूता ।। ७४ ।।
थोर व्यासकृपेनें हे ऐकिले मी रहस्य की ।
सांगत्या योग कृष्णाच्या, योगेशाच्या स्वतां मुखी ।। ७५ ।।
आठवू – आठवूनी हा राजा, संवाद अद्भुत ।
पुण्य कृष्णर्जुनीचा मी राहे हासत, नाचत ।। ७६ ।।
आठवूं – आठवूनी ते कृष्णाचे रुप अद्भुत ।
चके मी की महाराजा, राहे हासत नाचत ।। ७७ ।।
योगेश्वर जिथे कृष्ण, जिथे पार्थ धनुर्धर ।
यश, श्री, उन्नती तेथे मन्मते नीतीही स्थिर ।। ७८ ।।
भाग्याच्या गाईल्या श्रीमान उपनिषदातून हा ।
जीवनोच्च-कलेपायी शास्त्रे सर्व समन्वया ।।
श्रीकृष्णार्जुन संवादी ‘ मोक्षसंन्यास ’ नावाचा ।
अध्याय अठरावा ’ हो सर्वां मंगल, व्हायचा ।। १ ।।

卐